दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २६७ । शुक्रवार १० जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

**श्री हनुमान व पिंगला नाडी...** सहजयोग्यांसाठी श्री हनुमान हे एक आदर्श आहेत. ते आपल्या पूर्ण उजव्या बाजूवर (पिंगला नाडी) कार्य करत असतात. तेच तुम्हाला जरुर ते मार्गदर्शन करतात, सदैव विवेक देतात. मदत करतात आणि तुमच्या संरक्षणाची काळजी घेतात. तसेच तुमच्या अहंकारावर नियंत्रण ठेवतात. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते तुम्हाला गुरुविषयी समर्पणाची शक्ति देतात ते रावणाला फक्त अग्नीचे भय होते त्यांना हे माहित होते.श्रीरामांचे एकनिष्ठ सेवक होतेच पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते म्हणून त्यांनी लंकेत जाऊन लंकादहन केले; ल्यामध्ये कुणालाही, अगदी रावणालाही शारीरिक इजा झाली नाही. त्याच्या शक्तिपुढे सर्वजण भयभीत झाले. सर्व लोकांना रावणाव्या दुष्कृत्याबद्दल काही वाटत नव्हते,आता सर्वजण लंकादहन पाहून घाबरून गेले, रावण हा महापापी राक्षस आहे हे त्यांना समजून चुकले. यातून या बजरंगबलीजवळ केवढी समज व संतूलन होते हे लक्षात घेतले पाहिजे. शक्तीशाली माणसांनी असेच संयमी असले पाहिजे. शिवाजी महाराजही असेच होते. शक्ति आणि भक्ति वेगवेगळी असूच शकत नाही, आपण म्हणू शकतो की उजव्या हातात शक्ति आहे तर डाव्या हाताकडून भक्ति येणारच. हा शक्ति-भक्तीच। संगम हनुमानामध्ये पूर्णपणे दिसून येतो. तुम्हाला याचे अनुभव येतील. अशा तऱ्हेने तुमचे संरक्षण सदैव होणार आहे, या कार्यामध्ये बजरंगवली फार तत्पर आहेत.३१ मार्च १९९९,पुणे



'सहजयोग'
भाग १०४

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# जामखेडचे दुय्यम कारागृह कायमस्वरूपी बंद; ६२ आरोपींची नाशिकला रवानगी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील न्यायालयीन कोठडीसाठी वापरण्यात येणारे दुय्यम कारागृह अखेर राज्य शासनाच्या आदेशानुसार कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे. या कारागृहातील ६२ आरोपींना बुधवारी (दि. ९ जुलै) कडेकोट पोलीस बंदोबस्तात नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले. यापुढे जामखेड येथील न्यायालयीन कोठडीतील कैद्यांचा मुक्काम नाशिक मध्यवर्ती कारागृहातच होणार आहे.





राज्य शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने तसेच जीर्ण अवस्थेतील कारागृहांचा विचार करून महाराष्ट्रातील सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक ठिकाणी कारागृहांची इमारत जीर्ण झाल्याने तसेच कैदी पळून जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या कारागृहांतील सर्व कैद्यांना जवळच्या जिल्हा किंवा मध्यवर्ती कारागृहात टप्प्याटप्प्याने स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

याच निर्णयाची अंमलबजावणी करत जामखेड येथील दुय्यम कारागृहातील एकूण ६२ आरोपींना ९ जुलै रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पोलिस वाहनांच्या ताफ्यातून नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले. या आरोपींमध्ये ५९ पुरुष आणि ३ महिला आरोपींचा समावेश होता.

स्थलांतराच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी जामखेड कारागृह परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शांततेत, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

आरोपींना नाशिककडे रवाना करताना त्यांच्या नातेवाईकांनी (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### शरद पवारांचे पाच ते सहा खासदार अस्वस्थ : पृथ्वीराज चव्हाण

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाच ते सहा खासदार अस्वस्थ असल्याचा दावा केला. नवी दिल्ली येथे पत्रकारांसोबत संवाद साधताना ते म्हणाले, शरद पवार यांचे पाच ते सहा खासदार अस्वस्थ आहेत, काय करतील माहिती नाही.

मोदी शाह सरकार हात धुवून लागलेलं आहे, विरोधी पक्ष अस्तित्वात नसावा, अशी त्यांची इच्छा आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे जे केलं ते पवार साहेबांच्या एनसीपीत होऊ शकतं. खासदार सोडून जातील की नाही मात्र अस्थिर आहेत, असं ऐकतोय, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

दरम्यान, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी कोणीही नाराज नाही, असं म्हणत पृथ्वीराज चव्हाण यांचं वक्तव्य खोडून काढण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आमचा पक्ष एनडीएसोबत जाणार नसल्याचं म्हटलंय.

# कंत्राटदारांकडून ४० टक्के कमिशनचा महायुतीचा पायंडा?

## मिसिंग लिंक प्रकल्पाच्या कामाची 'कॅग'मार्फत चौकशी करू : माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाच्या कामात झालेल्या कथित अनियमितता आणि वाढलेल्या खर्चावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. या प्रकल्पाच्या कंत्राट प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करत, भाजप-महायुती सरकारच्या काळात कंत्राटदारांकडून ४० टक्के कमिशन घेण्याची प्रथा पडल्याची चर्चा असल्याचा गंभीर आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. सत्तांतर झाल्यास या प्रकल्पाची भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांच्यामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मिसिंग लिंक प्रकल्पाला स्थगिती दिल्याचा आरोप केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना चव्हाण यांनी प्रकल्पाला विरोध नव्हता, तर त्याची सुरक्षितता आणि वाढलेला खर्च याबाबत शंका होती, असे स्पष्ट केले.

चव्हाण म्हणाले, मिसिंग लिंक प्रकल्पाची संकल्पना ही काँग्रेस-आघाडी सरकारचीच होती. प्रकल्प होऊ नये, अशी भूमिका कधीच नव्हती. मात्र २०१३ मध्ये या प्रकल्पाला स्थगिती देताना नव्याने खर्चाचे गणित मांडावे, सुरक्षिततेची पुन्हा तपासणी करावी, विंड टनेल स्टडी करावी आणि प्रकल्पाची रचना भविष्यातील हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर सक्षम असल्याची खात्री करावी, अशा सूचना दिल्या होत्या.

मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर नुकतीच दरड कोसळण्याची घटना घडली आणि पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडल्याने प्रकल्पाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत बोलताना चव्हाण यांनी केवळ अभूतपूर्व पावसावर दोष टाकून चालणार नाही, हवामान बदलाचा अभ्यास करून त्यानुसार अभियांत्रिकी नियोजन झाले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

त्यांनी प्रकल्पाच्या मूळ अंदाजित खर्चात मोठी वाढ झाल्याबद्दलही प्रश्न उपस्थित केले. (पान ४ वर)

### मिसिंग लिंकवर प्रश्न विचारला तर महाराष्ट्राचा अपमान कसा?

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मिसिंग लिंकवर राजकारण करू नका या विधानावर टीका केली. विरोधात असताना आंदोलन करणे हे राजकारण नव्हते का? आता प्रश्न विचारले तर महाराष्ट्राचा अपमान होतो, असे म्हणणे योग्य नाही. केंद्र सरकारवर टीका केली की देशविरोधी आणि मिसिंग लिंकवर बोलले की महाराष्ट्राचा अपमान, मग जनतेने सरकारला प्रश्नच विचारायचे नाहीत का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### जनतेला 'कुत्रे', 'भाड्याचे टट्टू' म्हणताना लाज वाटली पाहिजे

शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यावर तीव्र टीका केली. जनतेच्या कराच्या पैशातून उभारलेल्या प्रकल्पात त्रुटी आढळल्यानंतर नागरिकांनी प्रश्न विचारले तर त्यांना 'भाड्याचे टट्टू' किंवा 'कुत्रे' म्हणणे ही सुलतानशाही आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशी भाषा शोभणारी नाही. जनतेचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असून सरकारने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असे राऊत म्हणाले.

# ठेवीदारांच्या हितासाठी लवकरच नवा कायदा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** बीड जिल्ह्यातील बहुचर्चित ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटीतील घोटाळ्यानंतर येथील ठेवादारांच्या ठेवी अद्यापही मिळालेल्या नाहीत. या पतसंस्थेमधील ठेवीदारांना त्यांचे कष्टाचे पैसे तातडीने परत मिळवून देण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

यासंदर्भात विधान भवन येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांसह बीडमधील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**'ज्ञानराधा'च्या ठेवीदारांचे पैसे त्वरित द्या; मुख्यमंत्र्यांचे निर्देश**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, ठेवीदारांचे हित जपण्यासाठी महाराष्ट्र गुंतवणूकदार हितसंरक्षण (एमपीआयडी) कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा. हा कायदा अधिक सक्षम करून त्याअंतर्गत वित्तीय संस्था किंवा बँकांच्या मालमत्ता जप्त करणे आणि त्यांचा लिलाव करणे, ही प्रक्रिया जलद करावी. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार क्लिष्ट आणि दीर्घकालीन प्रक्रियेला यंत्रणांना सामोरे जावे लागते. या प्रक्रियेत बदल करून, केंद्र शासनाच्या अंमलबजावणी संचालनालयाच्या धर्तीवर अशा प्रकरणातील जप्तीच्या कार्यवाहीसाठी राज्यातही व्यवस्था तयार करावी. त्यामुळे मालमत्ता जप्ती आणि लिलावाची कारवाई जलद गतीने करणे शक्य होईल.

बँकेच्या किंवा संस्थेच्या सर्व मालमत्तांचे अचूक मूल्यांकन करून, ज्या मालमत्तांचे मूल्यांकन सर्वाधिक आहे, त्यांचा प्राधान्याने विक्री केली जावी. मूल्यांकनानुसारच मालमत्तांची विक्री करून पारदर्शक पद्धतीने हा निधी थेट गुंतवणूकदारांना दिला जावा. या संपूर्ण प्रकरणाचा तिढा तातडीने सुटण्यासाठी गृह विभागाने अंमलबजावणी संचालनालयासोबत (ईडी) एकत्र बैठक घ्यावी आणि या कायदेशीर व तांत्रिक बाबींवर तातडीने कोणती पावले उचलता येतील, याबाबतची ठोस कार्यपद्धती निश्चित करावी, असेही आदेश मुख्यमंत्री फडणवीस (पान ४ वर)

# अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून कर्मचाऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एमआयडीसी परिसरातील एका नामांकित कंपनीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कथित मानसिक व शारीरिक त्रास दिल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मृत कर्मचाऱ्याच्या पत्नीच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयडीसीतील जी.के.एन. सेंटर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला कंपनीतील वरिष्ठांकडून वारंवार अपमानास्पद वागणूक देत मानसिक व शारीरिक छळ करण्यात येत होता. या सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित कर्मचाऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी समीर शेवाळे, प्लांट हेड पुरुषोत्तम ऋषी, सुरक्षा विभागातील बाबासाहेब निर्मळ आणि उपाध्यक्ष विठ्ठल हंडोरे यांच्यासह संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात व पोलीस उपनिरीक्षक मोंढे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. पोलिसांनी समीर शेवाळे, पुरुषोत्तम ऋषी आणि बाबासाहेब निर्मळ यांना ताब्यात घेतले असून प्रकरणाचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

# देखण्या तरुणीच्या आमिषाने एजंटला पकडण्याचा डाव

## 'हनीट्रॅप' फसला, एजंटचे फिल्मी पलायन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** सोशल मीडियावरील गोड बोलणे, देखणी मुलगी आणि थेट भेटीचे आमंत्रण... एखाद्या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची पटकथा शोभावा असा थरार नुकताच संगमनेर ते आळेफाटा दरम्यान प्रत्यक्ष पाहायला मिळाला. 'एकच गाडी, अनेक व्यवहार' करत अनेक ग्राहकांना लाखो रुपयांचा गंडा घालणाऱ्या आळेफाट्यातील एका चतुर एजंटला पकडण्यासाठी देणेदारांनी थेट 'हनीट्रॅप'चा डाव रचला. मात्र, देणेदारांना चकवा देत हा एजंट कच्च्या रस्त्याने गाडी पळवून 'फिल्मी स्टाईल'ने निसटण्यात यशस्वी झाला. मालवाहू गाड्यांच्या खरेदी-विक्रीसाठी आळेफाटा बाजारपेठ संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. मात्र, टोकन घेऊन फसवणूक करणाऱ्या काही बोटावर मोजण्याइतक्या एजंट्समुळे या मार्केटला गालबोट लागले आहे. अशाच एका महाभागाने बाजारात अनेकांचे पैसे थकवले होते आणि तो सतत देणेदारांना गुंगारा देत होता. अखेर कंटाळलेल्या देणेदारांनी त्याला पकडण्यासाठी एक भन्नाट शक्कल लढवली.देणेदारांनी एका ओळखीच्या मुलीच्या माध्यमातून संबंधित एजंटला सोशल मीडियावर जाळ्यात ओढले. हळूहळू त्यांच्यात फोन आणि व्हिडिओ कॉल्स सुरू झाले. मुलीला प्रभावित करण्यासाठी या एजंटने आपले वय अवघे २६ वर्षे असून, आपण अजून अविवाहित असल्याचे सांगत फुशारक्या मारल्या. अखेर दोघांनी 'संगमनेर टोल नाक्याजवळ' प्रत्यक्ष भेटायचे ठरवले.

आळेफाट्यात केवळ एका शब्दावर लाखो रुपयांचे व्यवहार होतात. मात्र, कमी भावात गाडी दाखवायची, टोकन घ्यायचे आणि तीच गाडी तिसऱ्यालाच विकायची, अशा फसव्या प्रवृत्तींमुळे संपूर्ण मार्केट बदनाम होत आहे.

या एजंटने अनेकांना जाळ्यात ओढून जमिनी विकायला लावल्या आणि देशोधडीला लावले. अशा फसव्या एजंट्सवर पोलिसांनी आता कडक कारवाई करावी, अशी मागणी व्यावसायिक आणि स्थानिक नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

### हिवरगावच्या रस्त्यावर हाय-स्पीड थरार

ठरल्याप्रमाणे हा एजंट पांढऱ्या रंगाच्या गाडीतून मोठ्या थाटात संगमनेर टोल नाक्याजवळ पोहोचला. समोर मुलगी दिसताच त्याच्या चेहऱ्यावर हसू उमलले, पण हा आनंद अवघ्या काही सेकंदांचाच ठरला. मुलीच्या मागे दबा धरून बसलेले देणेदार अचानक समोर आले आणि एजंटचे धाबे दणाणले.

..............................

पकडले जाण्याच्या भीतीने एजंटने तात्काळ गाडी वळवली आणि आळेफाटाच्या दिशेने सुसाट पळवली. देणेदारांनी पाठलाग सुरू केल्याने त्याने हिवरगाव पावसा गावाच्या कच्च्या आणि खराब रस्त्याने गाडी घातली. पुढे एजंटची पांढरी गाडी आणि मागे देणेदारांच्या गाड्या... असा हाय-स्पीड थरार कच्च्या रस्त्यावरून बराच वेळ सुरू होता. या दरम्यान संतप्त देणेदारांपैकी एकाने केलेल्या दगडफेकीत एजंटच्या खांद्याला दुखापतही झाली, मात्र तो चकवा देऊन निसटण्यात यशस्वी झाला.

### कार्यालयात धिंगाणा, एजंट फरार

हातचा शिकार निसटल्याने संतप्त झालेल्या देणेदारांनी थेट आळेफाटा येथील या एजंटचे कार्यालय गाठले आणि तिथे संध्याकाळी मोठा धिंगाणा घातला. मात्र, तोपर्यंत नेहमीप्रमाणे आपला मोबाईल बंद करून हा महाभाग फरार झाला होता.

# श्रीगोंद्यातील 'रोडे अर्बन निधी' च्या सहा पदाधिकाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा येथील रोडे अर्बन निधी लिमिटेड या संस्थेच्या सहा पदाधिकाऱ्यांविरुद्ध ठेवीदाराची तब्बल १२ लाख २५ हजारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर हा गुन्हा नोंदविण्यात आल्याने शहरातील ठेवीदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी हनुमंत कोंडीबा दांगट (रा. दांगटवस्ती, काष्टी, ता. श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांनी स्वतःच्या व मुलाच्या नावाने २०२३ ते २०२४ या कालावधीत संस्थेत विविध मुदत ठेवी केल्या होत्या. त्यांची मुदत पूर्ण झाल्यानंतर पैसे मागितले असता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी वारंवार टाळाटाळ केली. नंतर संस्थेच्या कामकाजात अडचणी असल्याचे सांगून ठेवीची रक्कम देण्यास नकार दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणात संतोष विठ्ठल रोडे, अभिजित प्रकाश देशमुख, विठ्ठल बबनराव रोडे, आदिती अभिजित देशमुख, प्रविण विठ्ठल रोडे आणि अमोल इंद्र रसाळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम (चझखू) १९९९ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. फिर्यादीनुसार, एकूण आठ मुदत ठेवींमधून १२ लाख २५ हजारांची रक्कम संस्थेत गुंतविण्यात आली होती. मुदत पूर्ण होऊनही पैसे परत न मिळाल्याने अखेर न्यायालयात धाव घ्यावी लागली. न्यायालयाच्या आदेशानुसार श्रीगोंदा पोलिसांनी ६ जुलै रोजी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून उपनिरीक्षक मनोहर खिदळकर यांच्याकडे तपास सोपविण्यात आला आहे.ही कारवाई झाल्यानंतर संबंधित संस्थेतील इतर ठेवीदारही पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, या प्रकरणाकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### तक्रारी व फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता ?

रोडे अर्बन प्रकरणात अनेकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली असल्याची जोरदार चर्चा सुरू असून फसवणुकीची रक्कम वाढण्याची दाट शक्यता असल्याने तक्रारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे लवकरच हा गुन्हा आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही

### ठेवीदारांना इशारा!

रोडे अर्बन निधी प्रकरणामुळे पुन्हा एकदा अनधिकृत व संशयास्पद गुंतवणूक योजनांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. जास्त व्याजाच्या आमिषाला बळी पडण्याऐवजी संस्थेची नोंदणी, आर्थिक स्थिती, अधिकृत परवानग्या आणि नियामक मान्यता यांची खातरजमा करूनच गुंतवणूक करावी, असा संदेश या कारवाईतून समोर आला आहे. दरम्यान, या प्रकरणात न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल झाल्याने संबंधित संस्थेतील इतर ठेवीदारही पुढे येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# बनावट जातवैधता प्रमाणपत्र प्रकरणी नऊ जणांना अटक : अशोक उईके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचसीईटी) सेलकडे अनुसूचित जमातीच्या आरक्षीत जागेचा लाभ घेण्यासाठी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याप्रकरणी अकरा जणांपैकी नऊ जणांना अटक करण्यात आली असून दोघे फरार आहेत अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक ऊइके यांनी आज विधानसभेत प्रश्नोतर तासात दिलेल्या उत्तरात दिली.

नितीन अर्जुन यांनी यासंदर्भात मूळ प्रश्न विचारला होता.नागपूर येथील ३२विद्यार्थ्यांनी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करून प्रवेश घेतले हे खरे का? बनावट प्रमाणपत्र प्राप्त केल्याने मूळ अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागले हे खरे का असे प्रश्न त्यांनी विचारले. उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री म्हणाले, बत्तीस विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र दाखल केल्याचे आढळून आले.

त्यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रियेदरम्यान रद्द करण्यात आले असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी कळविले आहे.बनावट वैधता प्रमाणपत्र तयार करण्याप्रकरणी दोन सहायक प्राध्यापकांसह एकूण ११जणांविरुद्ध पाचगाव पोलिस ठाणे, नागपूर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्यात (पान ४ वर)

# जीवाची बाजी लावणारे खरे नायक !




आपत्ती कधी, कुठे आणि कोणत्या रूपाने येईल, याचा नेम नसतो. कधी डोंगर कोसळतो, कधी पूल वाहून जातो, कधी इमारत जमीनदोस्त होते, तर कधी आगीचे रौद्ररूप शेकडो कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त करून जाते. मात्र प्रत्येक आपत्तीनंतर एक गोष्ट कायम दिसून येतेघटनास्थळी सर्वप्रथम धाव घेणारे राजकारणी नसतात, अधिकारी नसतात, तर अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन पथके, पोलीस, एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे कर्मचारी असतात. हेच खरे संकटमोचक असतात.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोतील भीषण इमारत दुर्घटनेने पुन्हा एकदा हेच सिद्ध केले आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान अनिल वाघ, पुंडलिक भुतापल्ले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवलेले धैर्य हे केवळ कर्तव्य नव्हे, तर मानवतेचे सर्वोच्च उदाहरण आहे. विषारी वायू, ऑक्सिजनचा अभाव, कचऱ्याचा प्रचंड दाब आणि कोणत्याही क्षणी आणखी ढिगारा कोसळण्याचा धोका असतानाही त्यांनी मागे हटण्याचा विचार केला नाही. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी तब्बल नऊ जणांना नवजीवन दिले. अशा जवानांना केवळ पुरस्कार नव्हे, तर समाजाच्या मनात कायमचे स्थान मिळाले पाहिजे.

विशेष म्हणजे, एकीकडे महाराष्ट्रात मुंबई-पुणे मिसिंग लिंकवरील दरड कोसळण्याच्या घटनेवरून आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण सुरू होते. विधानसभेत भाषणे, पत्रकार परिषदांमधील टीका, सोशल मीडियावरील प्रतिक्रिया आणि श्रेय-अपश्रेयाचा खेळ सुरू होता. पण त्याच वेळी मोशीमध्ये काही जवान मृत्यूशी दोन हात करत होते. एकीकडे शब्दांचे रणांगण रंगले होते, तर दुसरीकडे जीव वाचवण्यासाठी खऱ्या अर्थाने युद्ध सुरू होते. त्यामुळे काम करणारे वेगळे आणि त्याचे श्रेय घेणारे वेगळे, ही म्हण पुन्हा खरी ठरते.

भारताने [illegible] जवानांचे अनेक पर[illegible] पाहिले आहे[illegible] २०१३ मधील उत्तराखंडमधील केदारनाथ आपत्तीमध्ये भारतीय लष्कर, वायुसेना आणि एनडीआरएफच्या जवानांनी हजारो यात्रेकरूंना सुरक्षित बाहेर काढले. जवानांनी सलग अनेक दिवस झोप न घेता बचावकार्य केले. २०१८ मध्ये केरळमध्ये आलेल्या महापुरात मच्छीमारांसह बचाव पथकांनी हजारो नागरिकांचे प्राण वाचवले. २०२३ मध्ये उत्तरकाशीतील सिल्क्यारा बोगद्यात ४१ कामगार तब्बल १७ दिवस अडकले होते. देशातील विविध यंत्रणांनी तांत्रिक कौशल्य, संयम आणि जिद्दीच्या बळावर त्यांची सुखरूप सुटका केली. त्या प्रत्येक मोहिमेने जगाला भारतीय बचाव यंत्रणांची ताकद दाखवून दिली.

महाराष्ट्रातही माळीणची दरड, इर्शाळवाडी दुर्घटना, महाडमधील तळीये गाव, पूरग्रस्त सांगली-कोल्हापूर, रायगडमधील दुर्घटना अशा अनेक प्रसंगांत अग्निशमन दल, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि स्थानिक स्वयंसेवकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून बचावकार्य केले. त्या वेळी त्यांच्या धैर्याचे कौतुक झाले; परंतु काही दिवसांतच समाज त्यांना विसरून गेला. हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे.

आपत्ती व्यवस्थापन ही केवळ यंत्रणांची जबाबदारी नसून प्रशासनाच्या [illegible] कसोटी असते. प्रत्येक [illegible]तर चौकशी समित्या [illegible]या जातात, अहवाल [illegible]ार होतात, जबाबदारी [illegible]निश्चित करण्याच्या घोषणा होतात; पण अनेकदा त्यापुढे फारसे काही घडत नाही. त्यामुळे अशा घटना पुन्हा घडतात. मोशी दुर्घटनेतही याच प्रश्नांची [illegible]रे शोधावी लागतील. [illegible]तेचे निकष पाळले गेले होते का? देखभाल योग्य पद्धतीने झाली होती का? संभाव्य धोके वेळेत ओळखले गेले होते का? या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच कोणालाही क्लीन चिट देणे किंवा कोणालाही दोषमुक्त घोषित करणे, हे जनतेच्या विश्वासाला तडा देणारे ठरू शकते.

आपण अनेकदा सैनिकांबद्दल, पोलिसांबद्दल किंवा अग्निशमन दलाबद्दल बोलतो; पण त्यांच्या कामाच्या परिस्थितीकडे किती गांभीर्याने पाहतो? अनेक ठिकाणी अग्निशमन दलाकडे अत्याधुनिक उपकरणांची कमतरता आहे. अनेक जवानांकडे दर्जेदार सुरक्षा साहित्य उपलब्ध नसते. विषारी वायू, रासायनिक धोके किंवा कोसळणाऱ्या इमारतींमध्ये काम करताना त्यांना अत्याधुनिक संरक्षण मिळाले पाहिजे. त्यांचे नियमित प्रशिक्षण, विमा संरक्षण, मानसिक आरोग्याची काळजी आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेची हमी ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे.

समाजाचीही काही जबाबदारी आहे. दुर्घटना घडल्यावर घटनास्थळी गर्दी करणे, मोबाईलवर व्हिडिओ चित्रीकरण करणे किंवा बचावकार्यात अडथळा निर्माण करणे, ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. बचाव पथकांना आवश्यक ती मोकळी जागा आणि सहकार्य मिळाले तर अनेक जीव अधिक वेगाने वाचू शकतात.

लोकशाहीत सरकारवर प्रश्न विचारणे आवश्यक आहे. जबाबदारी निश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पण त्याच वेळी जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावणाऱ्या जवानांचे कौतुक करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण कोणतीही आपत्ती आली की सर्वप्रथम धावून येणारे हेच लोक असतात. त्यांना प्रसिद्धीची अपेक्षा नसते, राजकीय लाभाची इच्छा नसते किंवा टाळ्यांचा मोह नसतो. ''एक तरी जीव वाचला पाहिजे'' या भावनेतून ते जीवाची बाजी लावतात. मोशीतील जवानांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, खरे नायक हे व्यासपीठावर उभे राहून भाषण करणारे नसतात; ते ढिगाऱ्याखाली उतरून दुसऱ्याला जीवनदान देणारे असतात. समाजाने अशा जिगरबाजांना केवळ सलामच करू नये, तर त्यांच्या धैर्याला सन्मान देणारी व्यवस्था उभी करावी. कारण राष्ट्राची खरी ताकद मोठमोठ्या घोषणांमध्ये नसते; ती संकटाच्या क्षणी दुसऱ्याचा जीव वाचवण्यासाठी स्वतःचा जीव पणाला लावणाऱ्या अशा निस्वार्थी जवानांमध्ये असते.

# कुंभमेळ्याच्या धर्तीवर शिर्डीसाठी विशेष निधीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक येणार असल्याने शिर्डी नगरपरिषदेला केंद्र व राज्य सरकारकडून विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नगरसेवक दीपक गोंदकर व नगरसेवक अमित शेळके यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

बुधवारी मुंबईतील देवगिरी बंगल्यावर झालेल्या भेटीत शिर्डी शहराच्या विकासासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सिंहस्थ काळात साईभक्तांसाठी आवश्यक सुविधा उभारणे, रखडलेली विकासकामे पूर्ण करणे तसेच नगरपरिषदेच्या मालकीच्या भूखंडांचा विकास करण्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

शिर्डीत भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था, मूलभूत नागरी सुविधा आणि पर्यटन विकासासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्याची मागणीही करण्यात आली. या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून शिर्डीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिल्याचे गोंदकर व शेळके यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यात्मिक पर्यटनाला चालना देणाऱ्या विविध सुविधा उभारण्यात येणार असून त्याचा लाभ साईभक्तांसह सिंहस्थासाठी येणाऱ्या भाविकांना होणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.



नगरसेवक शेळके व गोंदकर यांनी वाढीव निधीच्या मागणीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली.

# निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात साई आदर्शकडून वारकऱ्यांसाठी सेवा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा २०२६ निमित्त पंढरपूर पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी साई आदर्श मल्टीस्टेटच्या वतीने चहा व अल्पोपहाराचे नियोजन करण्यात आले. या उपक्रमातून हजारो वारकऱ्यांची सेवा करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न संस्थेने केला.

यावेळी साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, दीपक त्रिभुवन, सुनील संचेती, रंगनाथ घाडगे, व्यवस्थापक सचिन खडके तसेच संस्थेचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांना चहा व अल्पोपहाराचे वाटप केले. वारकरी सेवेचा हा उपक्रम भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला.

संतांच्या पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. धार्मिक परंपरेला सामाजिक सेवेची जोड देत साई आदर्श मल्टीस्टेटने राबविलेल्या या उपक्रमाचे वारकरी व नागरिकांनी कौतुक केले.




# सिन्नरचा शूर सुपुत्र पॅरा कमांडो शाकीब पठाण यांना आग्रा येथे वीरमरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी / सिन्नर**



सिन्नर तालुक्यातील सोनांबे गावचे सुपुत्र आणि भारतीय लष्कराच्या ४११ पॅरा युनिटमध्ये कार्यरत असलेले पॅरा कमांडो शाकीब पिरमंहमद पठाण (वय ३२) यांना वीरमरण आले आहे. आग्रा येथील सैन्य दलाच्या निवास परिसरात काम करत असताना विजेचा तीव्र धक्का बसल्यामुळे त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अवघ्या १५ दिवसांपूर्वीच ते सुट्टी संपवून कर्तव्यावर रुजू झाले होते. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून लष्करात दाखल झालेल्या या शूर सुपुत्राच्या जाण्याने संपूर्ण सिन्नर तालुक्यात व सोनांबे गावावर शोककळा पसरली आहे.कमांडो शाकीब यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, साजन नावाचा लहान मुलगा आणि दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोनांबे या त्यांच्या मूळ गावी लष्करी व शासकीय इतमामात आणि मुस्लिम रितीरिवाजांनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. या वीर सुपुत्राला सर्व स्तरातून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली जात आहे.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी समिती नेमण्याचा निर्णय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** येथील महात्मा फुले कृषीव विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या प्रश्नांच्या सर्वंकष अभ्यासासाठी आणि योग्य तो मार्ग काढण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

या समितीत प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधीचाही समावेश करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले. तसेच, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, त्यांच्या प्रलंबित प्रश्नांचे लवकरात लवकर निराकरण व्हावे आणि शासन स्तरावर सकारात्मक निर्णय व्हावेत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहोत.

या बैठकीस आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अक्षय कर्डीले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे रजिस्ट्रार राजेंद्र पाटील, मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक कॉलेजतर्फे वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय सेवा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी श्रीरामपूर येथील लोकमान्य टिळक वाचनालयात भव्य मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर संपन्न झाले. शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या 'एनएसएस' व कम्युनिटी मेडिसिन विभागातर्फे या 'माऊली सेवेचे' आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य डॉ. रिजवान अहमद यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टर्स व विद्यार्थ्यांनी शेकडो वारकऱ्यांची तपासणी केली. शिबिरात संधिवात, त्वचारोग, सर्दी-तापावर मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात आली. तसेच थकलेल्या वारकऱ्यांच्या पायांना औषधी तेलाने मसाज करून जलसेवा पुरवण्यात आली.संचालक दिलीप पवार यांच्या हस्ते पालखीचे पूजन झाले. या उपक्रमाला आयुष मंत्रालयासह विविध संस्थांचे सहकार्य लाभले.



# बोरावके कॉलेजमध्ये पदवी व पदव्युत्तर नवीन तुकड्यांना मान्यता ; प्रवेश प्रक्रिया सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील रयत शिक्षण संस्थेचे नामांकित रा.बा. नारायणराव बोरावके महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून टी.वाय.बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी आणि एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या वर्गांच्या अभ्यासक्रमाची दुसरी तुकडी सुरू करण्यासाठी शासनाची अंतिम मान्यता मिळाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. प्रवीण बडधे यांनी दिली.

महाविद्यालयात हे नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि त्यांच्या अतिरिक्त तुकड्या सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आता मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या ठिकाणीच दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.

रयत शिक्षण संस्था, सातारा येथील मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या व रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूरच्या प्रमुख मीनाताई जगधने यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि विशेष प्रयत्नांमुळे हे नवीन विषय व तुकड्या मंजूर झाल्या आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक वर्तुळातून विशेष आभार मानले जात आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयाच्या प्रवेश विभागाशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# विधानसभेबाबत आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना-महायुतीकडून निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर,:** संगमनेर नगरपरिषदेच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा विधानसभेत उपस्थित झाल्यानंतर निर्माण झालेल्या वादात आता शिवसेना-महायुतीने उडी घेतली आहे. संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षांनी विधानसभेबाबत केलेल्या कथित अवमानकारक वक्तव्याचा शिर्डी लोकसभा शिवसेना-महायुती व संगमनेर तालुका महायुतीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विठ्ठल घोरपडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे राज्याच्या सर्वोच्च विधानसभेबाबत अशा प्रकारची वक्तव्ये करणे अशोभनीय असून, तो सभागृहाचा अवमान असल्याची टीका केली. लोकशाही संस्थांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

घोरपडे यांनी आमदार अमोल खताळ यांच्या विधानसभेतील कामकाजाचेही कौतुक केले. पावसाळी अधिवेशनात त्यांनी शेतकऱ्यांचा पीकविमा, वीजपुरवठा, आरोग्य, शिक्षण, ग्रामीण रस्ते तसेच संगमनेर तालुक्याच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्न प्रभावीपणे मांडल्याचे त्यांनी सांगितले.

संगमनेर नगरपरिषदेच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करून आमदार खताळ यांनी जनभावना विधानसभेत मांडल्या असल्याचे घोरपडे यांनी म्हटले. या भूमिकेबद्दल शिवसेना-महायुतीच्या वतीने आमदार खताळ यांचे अभिनंदन व आभारही त्यांनी व्यक्त केले.

# पावसाळी थंडीत लोकशाहीचा उबदार घोट! श्रीरामपुरात तहसीलदार वाघ यांची 'चाय पे चर्चा'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रिमझिम पडणारा पाऊस, वातावरणातील पावसाळी गारवा आणि अशातच हातात मिळालेला फक्कड कडक चहाचा ग्लास... या उबदार वातावरणात जेव्हा थेट प्रशासकीय अधिकारीच गप्पांमध्ये सामील होतात, तेव्हा लोकशाहीच्या गप्पांना एक वेगळाच रंग चढतो. श्रीरामपूर येथील एका चहाच्या दुकानात नुकताच असाच एक आगळावेगळा संगम पाहायला मिळाला.

मतदार यादी सुधारण्याच्या 'एस.आय.आर.' मोहिमेला जनजागृतीचा नवा रंग देण्यासाठी तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मिलिंदकुमार वाघ यांनी 'चाय पे चर्चा'चा अनोखा फंडा वापरला. नेहमीच्या शासकीय फाईल्स बाजूला ठेवून, हातात चहाचा ग्लास घेत तहसीलदार थेट सामान्य नागरिकांच्या गप्पांमध्ये सामील झाले. प्रशासनाचा हा जिव्हाळा पाहून नागरिकही भारावून गेले.पावसाळ्यात जसा कडक चहा मनाला उब देतो, तसाच शुद्ध मतदारयादीचा आधार लोकशाहीला बळकटी देतो,असे सांगत तहसीलदार वाघ यांनी उपस्थित नागरिकांना मतदार नोंदणी आणि दुरुस्तीचे महत्त्व पटवून दिले. तसेच, सध्या बीएलओ घरोघरी येत असून त्यांना नागरिकांनी योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.प्रशासनाच्या या भूमिकेवर बोलताना एका स्थानिक तरुणाने, ''साहेब चहा पिण्यासाठी आले आणि सोबतीने लोकशाहीचे धडेही देऊन गेले,'' अशी कृतज्ञ प्रतिक्रिया दिली. या अनोख्या उपक्रमामुळे चहाच्या प्रत्येक घोटासोबत आता 'एस.आय.आर.'चा संदेश शहरभर पसरत आहे.या 'चाय पे चर्चा' प्रसंगी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्यासह स्वीप नोडल अधिकारी गणेश पिंगळे, संदीप पाळंदे, अजय धाकतोडे आणि सुजित जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.

> ''चहाचा एक घोट आणि सर्वसामान्यांशी केलेली मनमोकळी चर्चा यातून जे विश्वासाचे नातं तयार होतं, ते कुठल्याही मोठ्या सभेत तयार होऊ शकत नाही. 'एस.आय.आर.'चा संदेश घराघरात पोहोचवण्यासाठी हाच सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. तालुक्यातील एकही पात्र मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''
>
> **' गणेश पिंगळे, स्वीप नोडल अधिकारी, श्रीरामपूर.**
>
> **(छाया - सदिप पाळंदे )**



# अपघात रोखण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :**अहिल्यानगर जिल्हयातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यातील अपघात वळण ठिकाणे, अतिक्रमण, धोकादायक चौक, ब्लॅकस्पॉट, अपूर्ण सुरक्षा उपाययोजना तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते अभिजीत पोटे यांनी जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. प्रवरा संगम परिसरातील अनेक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

अभिजीत पोटे यांनी मांडलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करून निश्चित कालावधीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

बैठकीस शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब कदम, संजय वाघ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी रस्ता सुरक्षेबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नसून, प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करून निश्चित मुदतीत कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे स्पष्ट निर्देश दिले.



# मच्छिंद्र पवार तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्हा स्वस्त धान्य व रॉकेल परवानाधारक असोसिएशनच्या जिल्हा मेळाव्यात संघटनेतील सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत मच्छिंद्र पवार पाटील यांची नेवासा तालुका स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागीय अध्यक्षा मीनाताई कळकुंबे यांनी पवार पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. राज्य फेडरेशन व जिल्हा असोसिएशनची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविणे, संघटना बळकट करणे आणि सभासद वाढीसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे पाटील यांनी दुकानदारांच्या प्रश्नांसाठी काम करण्याचे आवाहन केले. या निवडीबद्दल जिल्हासचिव सोमनाथ देवकर, जिल्हा उपाध्यक्ष बाबा शेख,बाळासाहेब थोरात,प्रकाश जाधव, पंकज आरसुळे,अंबादास भवार,जगन्नाथ पेहेरे, दत्तात्रय काकडे, महादेव दराडे,अण्णासाहेब दरंदले,भारत गवळी, येडू ढगे,ईश्वर मते,साईनाथ धुमाळ,ज्ञानेश्वर पवार,रमेश लोखंडे, सचिन कडू, शिवाजी काकडे, देविदास मुखेकर, रेवन कांगुणे यांच्यासह तालुक्यातील दुकानदारांनी त्यांचे अभिनंदन केले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## सरला बेटाच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**वडाळा महादेव** : श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेटाच्या २०० वर्षांची परंपरा लाभलेल्या आषाढी वारी दिंडीचे महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते पंढरपूरकडे भव्य प्रस्थान झाले.

'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषात हजारो वारकरी या शिस्तप्रिय दिंडीत सहभागी झाले आहेत. यंदा भरपूर पाऊस पडू दे आणि शेतकरी सुखी होऊ दे, असे साकडे विठ्ठलचरणी घालणार असल्याचे महाराजांनी सांगितले.

## एमएसबीटीईकडून प्रवरा तंत्रनिकेतनला 'एक्सलंट ग्रेड'

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (तंत्रनिकेतन), लोणी येथील इंटिरिअर डिझाईन अँड डेकोरेशन अभ्यासक्रमाला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई), मुंबई यांच्या बाह्य शैक्षणिक मूल्यमापन समितीकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी 'एक्सलंट ग्रेड' प्रदान करण्यात आला आहे. एमएसबीटीईने अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, अध्यापनाची गुणवत्ता, प्रयोगशाळा व ग्रंथालय सुविधा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि गुणवत्ता हमी प्रणाली आदी निकषांवर संस्थेचे मूल्यमापन केले.

सर्व निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याने हा मानाचा दर्जा प्राप्त झाला. प्रवरेत विद्यार्थी-केंद्रित शिक्षण व उद्योगाभिमुख कौशल्य विकासावर भर दिला जात असल्याचे संस्थेने नमूद केले. प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी, विभागप्रमुख प्रा. निकिता बावके, प्रा. सुनील लोखंडे, प्रा. आश्विनी घोलप, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे यश मानले जात आहे.

## एसटी-कारचा भीषण अपघात; वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू

**राहुरी** : तालुक्यातील चिंचोली परिसरातील हॉटेल एकाजवळ एसटी बस आणि कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. रस्ता खराब असल्याने एसटी चालकाने चुकीच्या बाजूने बस चालविल्यामुळे हा अपघात घडला. या भीषण अपघातात कारमधील तिघे जण गंभीर जखमी झाले होते.

यातील गंभीर जखमी कदीर फकीर शेख (वय ७०, रा. हसनापूर, ता. राहता) यांचा लोणी येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर राजू शेख आणि नजीर सय्यद यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी स्थानिक तरुणांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल केले. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## विवाह सोहळ्यात वृक्षदानाने पर्यावरणाचा संदेश



**श्रीरामपूर** : आजच्या धावपळीच्या युगात विवाह सोहळ्यांमध्ये होणारी अवास्तव उधळपट्टी आणि पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी एका आदर्श विवाह सोहळ्याचे दर्शन नुकतेच श्रीरामपूर येथे घडले. 'निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य'चे उपाध्यक्ष प्रकाश केदारी यांचे सुपुत्र प्रमोद आणि आरती यांचा विवाह सोहळा केवळ थाटामाटातच नव्हे, तर पर्यावरण पूरक उपक्रमांनी संपन्न झाला.

या विवाह सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, उपस्थित पाहुण्यांना आहेर म्हणून झाडांची रोपे व प्लास्टिक मुक्तीच्या हेतूने ५०० कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कोणत्याही प्रकारची उधळपट्टी न करता, समाजाला 'वृक्षारोपण आणि संवर्धन' या महत्त्वाचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. केदारी कुटुंबाने घेतलेला हा निर्णय सध्या संपूर्ण परिसरात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे.

## विजेच्या लोंबकळलेल्या तारांमुळे पुणतांब्यात अपघाताची भीती

**पुणतांबा** : राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील डेरा नाला भागातील शेतातील विजेच्या तारा प्रचंड लोंबकळत असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

पावसाळ्यामुळे विजेचे खांब वाकले असून, तारा ऊसाच्या पिकाला स्पर्श करत आहेत. वारंवार तक्रार करूनही महावितरण दुर्लक्ष करत असल्याने, 'मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का?' असा संतप्त सवाल स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे.

# आमची लढाई प्रवरेच्या सभासदांच्या हक्कासाठी : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : गणेश सहकारी साखर कारखान्याचे निवडणुकीबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देत भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट घोषणा केली की, आम्ही गणेश सहकारी साखर कारखान्याची निवडणूक पुन्हा लढविणार नाही. आमचे कार्यकर्तेही ती निवडणूक लढवणार नाहीत.

कारखाना तुमचाच आहे.मात्र, गणेश कारखान्याशी संबंधित न्यायालयीन वादाबाबत भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले आमची लढाई कोणत्याही व्यक्ती विरोधात अथवा कोणतीही संस्था बंद पाडण्यासाठी नाही. कर आमची लढाई प्रवरा कारखाना सभासदांचे हक्काच्या पैशांसाठी आहे. ते पैसे ना. राधाकृष्ण विखे पाटील किवा डॉ सुजय विखे पाटील यांचे नाहीत, तर प्रवरा कारखान्याचे सभासदांचे आहेत. सभासदांनी उभे केलेल्या त्या पैशांचे संरक्षण करण्यासाठीच आम्ही न्यायालयीन लढाई लढत आहोत. राहाता येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी राहाता व गणेश परिसरातील भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऊस प्रश्नावर विरोधकांना प्रत्युत्तर देताना डॉ. विखे म्हणाले, ऊस कोणत्या कारखान्याला द्यायचा, हा निर्णय शेतकऱ्यांचा आहे. गणेश कारखाना आम्ही चालवत असताना इतर कारखान्यांनी आमच्या कार्यक्षेत्रातील ऊस पळविला होता. मग आता आमच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या इच्छेनुसार ऊस देण्यास विरोध का?असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राजकीय आरोप-प्रत्यारोपांवर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, त्यांचा कोणत्याही व्यक्तीशी वैयक्तिक वाद नाही.

कोपरगावमध्ये दोन आमदार झाले, त्याचा आनंदच आहे. त्यांनी विकासाची कामे करावीत. विरोधकांच्या भाषणांवर वेळ घालवण्यापेक्षा विकासाचे मुद्द्यांवर चर्चा करावी,असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.राहाता शहराच्या विकासाबाबत विश्वास व्यक्त करताना डॉ. विखे म्हणाले, आजचे राहाता आणि दोन वर्षांनंतरचे राहाता शहर यात मोठा फरक दिसेल.शहराचा विकासात्मक चेहरामोहरा बदलून जाईल. विकासकामांवरच आमचा भर राहणार आहे.

भाजपच्या संघटन शक्तीवर विश्वास व्यक्त करत ते म्हणाले जोपर्यंत कार्यकर्ते प्रामाणिक आहेत, तोपर्यंत भारतीय जनता पक्ष आणि विखे पाटील यांच्या नेतृत्वाला कोणताही धक्का लागू शकत नाही. शेवटी कार्यकर्त्यांना संयम राखण्याचे आवाहन करत विरोधकांच्या टीकेला उत्तर देण्यात वेळ घालवू नका. आपले राजकारण विकास, प्रगती आणि लोकांच्या विश्वासावर उभे आहे. शांत राहा आणि विकासाची कामे करत राहा.असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

## सोनगावात झाडाची फांदी कोसळली

### मुले थोडक्यात बचावली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील सोनगाव येथील घास गल्ली परिसरात सलग सुरू असलेल्या पावसामुळे ५० ते ६० वर्षे जुन्या जीर्ण झाडाची मोठी फांदी अचानक रस्त्यावर कोसळली. सुदैवाने पावसामुळे चिखल असल्याने परिसरातील लहान मुले ग्रामपंचायत मैदानावर खेळत होती, ज्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

या झाडासमोरच अंगणवाडी असल्याने चिमुकल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. घटना घडून दोन दिवस उलटले, तरी प्रशासनाने रस्त्यावरील फांदी हटवलेली नाही. त्यामुळे वाहतुकीस अडथळा येत असून अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासनाने या धोकादायक झाडाची तातडीने छाटणी करावी आणि जीर्ण झाडांचे सर्वेक्षण करून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## गटकळ स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा पदग्रहण समारंभ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मध्ये नुकतेच नवीन शैक्षणिक वर्षासाठी हेड बॉय, हेड गर्ल, स्पोर्ट कॅप्टन बॉईज, स्पोर्ट कॅप्टन गर्ल या पदासाठी मतदान झाले मतदानाच्या माध्यमातून निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना आज पदा चे बॅचेस देऊन शपथ विधी समारंभ पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टाकळीभान येथील युवा उद्योजक गणेश कोकणे हे उपस्थित होते त्यांच्या हस्ते निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना बॅचेसचे वाटप करण्यात आले, आपल्या देशात होणारी मतदान प्रक्रिया त्यातून निवडून येणारे उमेदवार याचा प्रत्यक्ष अनुभव शाळेत विद्यार्थ्यांना घडवून आणण्यात आला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब टेमक व एडवोकेट सुरेखा टेमक यांनी निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की आयुष्यामध्ये खरा सेवक होण्यासाठी आपण स्वयंशिस्तीचे पालन केले पाहिजे ,समाजसेवा करावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता पटारे व वर्षा मगर यांनी केले व आभार माधुरी गटकळ यांनी मानले.

## सार्थक बोरबणेची अग्निवीर म्हणून निवड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील सार्थक रवींद्र बोरबणे (हल्ली, रा. पुणतांबे) यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून नियुक्ती झाली आहे. सार्थक बोरबणे यांचे वडील रवींद्र रामाभऊ बोरबणे व आई पुनम रवींद्र बोरबणे हे शेतकरी कुटुंबातील आहेत.

सार्थकने लहानपणापासून सैन्य दलात भरती होण्याचा संकल्प केला होता. हा संकल्प त्यानी अग्निवीर म्हणून निवड झाल्याने पूर्ण झाला आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेमध्ये झाले असून माध्यमिक शिक्षण न्यु इंग्लिश स्कुल पुणतांबा येथे झाले. तसेच इयत्ता ११ वी व बारावीचे शिक्षण गरूड ऍकेडमी नाशिक येथे पूर्ण केले. सैन्य दलाचे प्रशिक्षण पुणे जिल्ह्यातील दिघी येथे बॉम्बे इंजिनिअरींगमध्ये ७ महिने यशस्वीपणे पूर्ण केले.

आता सार्थकची अग्निवीर म्हणून आसाममध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आज गळनिंब ते पंढरपूर दिंडीचे प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील गळनिंब येथील आराध्य ग्रामदैवत सिद्धेश्वर भगवान पायी दिंडी सोहळ्याचे आज, शुक्रवार दि. १० जुलै रोजी सकाळी सिद्धेश्वर मंदिरातून अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे.

विशेष म्हणजे, या पायी दिंडी सोहळ्याचे हे पहिलेच वर्ष असल्याने गळनिंब व परिसरातील वारकरी आणि भाविकांमध्ये अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळत आहे.

हा सोहळा ह.भ.प. बाळकृष्ण महाराज पारखे, ह.भ.प. भगवान महाराज गडधे आणि ह.भ.प. रामदास महाराज दाते यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आला आहे. 'श्रीक्षेत्र सिद्धेश्वर देवस्थान गळनिंब ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी वारी पायी दिंडी सोहळा कमिटी'ने या वारीचे नेटके नियोजन केले आहे.या दिंडी प्रस्थानाच्या या ऐतिहासिक आणि पवित्र क्षणी गळनिंब व परिसरातील सर्व गावकऱ्यांनी, भाविक भक्तांनी सिद्धेश्वर मंदिरासमोर मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठूनामाच्या गजरात दिंडीला निरोप द्यावा, असे आवाहन सिद्धेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ समस्त ग्रामस्थ सिद्धेश्वर बहुउद्देशीय भजनी मंडळ गळनिंब सिद्धेश्वर यात्रा कमिटीच्या वतीने केले.

## तांदुळवाडी जि.प. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निकम; उपाध्यक्ष धागुडे





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तांदुळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रविंद्र आण्णासाहेब निकम तर उपाध्यक्षपदी दशरथ लक्ष्मण धागुडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनासाठी मावळते अध्यक्ष तथा पत्रकार विनीत धसाळ यांच्या उपस्थितीत पालक व ग्रामस्थांची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती संगीता बेदरे होत्या. त्यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनाची प्रक्रिया, समितीची उद्दिष्टे, अधिकार व जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी समितीच्या सदस्यपदी महेश बबन वाघ, सौ. जयश्री प्रवीण धसाळ, सौ.सिमा गणेश चव्हाण, सौ.आरती नितीन खडके, सौ. पूजा सागर निकम, सौ. शितल देविदास ससाणे, मोनाली गारूडकर, अकबर पठाण तसेच ग्रामपंचायत सदस्य शिवाजी खडके यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष रविंद्र निकम यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसह भौतिक सुविधा, विद्यार्थी विकास आणि पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपाध्यक्ष दशरथ धागुडे यांनीही शाळेच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची ग्वाही दिली. बैठकीस सिद्धार्थ पेरणे, सोमनाथ डूक्रे यांच्यासह पालक, ग्रामस्थ व शिक्षक उपस्थित होते. शिक्षक रमेश घोडके यांनी आभार मानले.


### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी चांदे बु ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम. गौतम दादा सूर्यवंशी रा. चांदे, बु ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांनी भाची नामे श्री/श्रीम. कोमल मारूती साबळे या नावे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू चांदे बु ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि १७/०२/२००४ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि. ११/०३/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी,

दिनांक ३०/०६/२०२६

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**


## प्रवरा पब्लिक स्कूलचे जलतरणात दमदार यश

### १२ जलतरणपटू राज्यस्तरीय स्पर्धेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : प्रतिनिधी : पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा पब्लिक स्कूलने जलतरण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरावर आपला ठसा उमटविला आहे. जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत शानदार कामगिरीच्या जोरावर शाळेच्या तब्बल १२ जलतरणपटूंनी राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला असून, या यशामुळे शाळा आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लोणी येथील सैनिक स्कूलमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे २५ शाळांमधील ३०० हून अधिक जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांमध्ये उत्कृष्ट कौशल्य दाखवत राज्यस्तरीय स्पर्धेचे तिकीट निश्चित केले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये उमेर शेख, प्रथमेश महाजन, हर्षद भरसे, अमोल पवार, पवनदीप तिष्ठक, यश वाकडे, रूपेश पवार, चिन्मय पवार, विनोद वळवणे, आर्यन वाघेरे, रुद्रप्रताप देशमुख आणि अरीका शेख यांचा समावेश आहे. या सर्वांनी फ्रीस्टाईल, ब्रेस्टस्ट्रोक, बॅकस्ट्रोक आणि बटरफ्लाय प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. या यशामागे शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे, पर्यवेक्षिका सौ. एम. एस. जगधने, सौ. शुभांगी रत्नपारखी, क्रीडा संचालक अफजल पटेल, क्रीडा शिक्षक दीपक जाधव तसेच जलतरण प्रशिक्षिका योगिता तनपुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


### जाहीर प्रगटन

**बक्षिसपत्र दस्त हरवल्याबाबत**

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनादवारे कळविण्यात येते की, मौजे केंदळ बु. ता. राहुरी जि. अहिल्यानगर येथिल गट नं. २७१/१ पैकी यासी क्षेत्र ०हे ४४आर या मिळकतीचे सन २०२३ मधिल मुळ बक्षिसपत्र दस्त नं. रहर २००३/२०२३ दि.१२/०५/२०२३. (दस्ता लिहुन देणार इंदुबाई नाना कैतके दस्त लिहुन घेणार उदधव नानासाहेब कैतके) असा मुळ दस्त तसेच मुळ पावती श्री. उदधव नानासाहेब कैतके यांचेकडुन केंदळ बु. ते राहुरी बु. ता. राहुरी या परिसरात पडुन गहाळ झालेले आहे. त्याबाबत श्री. उदधव नानासाहेब कैतके यांनी राहुरी पोलिस स्टेशन, राहुरी येथे दि.०७/०७/२०२६ रोजी सदर मुळ दस्त हरविलेबाबत विनंती अर्ज क्र. ०४३०/२०२६ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. वरील मुळ बक्षिसपत्र दस्त व मुळ पावती वर नमुद केलेल्या मिळकतीबाबतची आहेत. तरी वर नमुद केलेल्या मिळकतीचे मुळ बक्षिसपत्र दस्त नं. रहर २००३/२०२३ व मुळ पावती कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणुन दयावी ही. नम्र विनंती. सदर मुळ बक्षिसपत्र दस्त व मुळ पावती कोणास सापडल्यास त्याचा गैरवापर न करता खालील पत्त्यावर आणुन दयावी.

दि. ०९/०७/२०२६

**ॲड. रविंद्र काशिनाथ गागरे**
**ऑफीस - छत्रपती नगर,**
**शेटे इस्टेट, गोकुळ कॉलनी,**
**राहुरी बु. ता. राहुरी जि.अ.नगर**
**मो.नं. ९८५०६१३०१६**



### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी गुरवपिंप्री ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम. संगिता रविंद्र गंगावणे यांनी दिर नामे श्री/श्रीम. भारत बापू गंगावणे या नावे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू गुरवपिंप्री ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि. ०५/०८/१९८६ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि.०४/१२/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्याजाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**( रवि सतवन )**
**तहसिलदार कर्जत**


# दोंदे हत्याप्रकरणी नगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको

### शिवसेना व आंबेडकरी संघटनांचे आंदोलन; उच्चस्तरीय चौकशीसह आर्थिक मदतीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पात कंत्राटी सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेल्या श्रीकांत पोपट दोंदे यांच्या हत्याप्रकरणी गुरुवारी शिवसेना तसेच विविध आंबेडकरी संघटनांनी नगर-मनमाड महामार्गावरील विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सुमारे दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक काही काळ विस्कळीत झाली.

आंदोलनादरम्यान विद्यापीठ प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी निवेदन स्वीकारण्यासाठी वेळेत न आल्याने आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे व कामगार कल्याण अधिकारी डॉ. उगले यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. मात्र, कुलसचिवांनी स्वतः उपस्थित राहून निवेदन स्वीकारावे, या भूमिकेवर आंदोलनकर्ते ठाम राहिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. अखेर कुलसचिव राजेंद्र पाटील यांच्या वतीने सहाय्यक कुलसचिव पेंडभाजे यांनी घटनास्थळी येऊन दोंदे यांच्या कुटुंबीयांकडून व आंदोलनकर्त्यांकडून निवेदन स्वीकारले. योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

निवेदनात हत्याप्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत उच्चस्तरीय चौकशी, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना सहआरोपी करून कठोर कारवाई, दोंदे यांच्या कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत व कुटुंबातील एका पात्र सदस्याला विद्यापीठात कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी करण्यात आली. तसेच विद्यापीठातील अपुरी सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही, प्रकाशयोजना व नियमित पाहणीच्या अभावावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. आंदोलनादरम्यान पोलिसांनी बंदोबस्त ठेवून परिस्थिती नियंत्रणात आणली. आंदोलन संपल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

## खानापूर केटीवेअर बंधाऱ्यात पाणी दाखल

### शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**माळवाडगाव** : नाशिकच्या नांदूर मध्यमेश्वर प्रकल्पातून गोदावरी नदीत पाणी सोडण्यात आल्याचा संदेश मिळताच श्रीरामपूर तालुक्यातील गोदाकाठचे शेतकरी सतर्क झाले. खानापूर केटीवेअर बंधाऱ्याच्या ढापे काढलेल्या नसल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले. या गंभीर प्रश्नावर वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होताच पाटबंधारे विभाग खडबडून जागा झाला. संबंधित विभागाने ठेकेदाराच्या माध्यमातून तातडीने जेसीबीच्या साहाय्याने दुपारपर्यंत सर्व फळ्या काढण्याचे काम पूर्ण केले.

स्थानिक शेतकऱ्यांनीही या कामात सहकार्य केले. काम पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी पाच वाजता बंधाऱ्यात पाण्याचे जोरदार आगमन झाले. यावेळी पाहणीसाठी आलेले नॉर्दन ब्रँचचे शाखा अभियंता अशद शेख यांना शेतकऱ्यांनी प्रशासकीय दुर्लक्षाबाबत जाब विचारला. शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे बंधाऱ्याचे संभाव्य नुकसान टळले. पाणी दाखल होताच अभियंता शेख, स्थापत्य सहाय्यक अभियंता श्रीमती वऱ्हाडे, कालवा निरीक्षक श्रीमती मोकळ आणि स्थानिक माजी सरपंच दत्तात्रय आदिक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत गोदावरीच्या पाण्याचे उत्साहात जलपूजन करण्यात आले. बंधाऱ्यात पाणी आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पान १ वरुन

### जामखेडचे दुय्यम कारागृह कायमस्वरूपी बंद; ६२ आरोपींची नाशिकला रवानगी

कारागृहाबाहेर उपस्थित राहून निरोप दिला. या वेळी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याचे भावनिक चित्र पाहायला मिळाले.
या स्थलांतर प्रक्रियेदरम्यान सर्व प्रशासकीय व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी तसेच खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.
राज्य शासनाच्या धोरणानुसार दुय्यम कारागृहांचे कामकाज टप्प्याटप्प्याने बंद करून कैद्यांचे स्थलांतर मोठ्या व अधिक सुरक्षित कारागृहांमध्ये करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जामखेड येथील दुय्यम कारागृहाचे कामकाज कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे.

..............

### ठेवीदारांच्या हितासाठी लवकरच नवा कायदा

यांनी यावेळी दिले. दरम्यान, बीड जिल्ह्यातील आणि इतर भागांतील पीडित ठेवीदारांची बाजू मांडत या प्रक्रियेत गती आणण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी यावेळी केली. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बीड जिल्हाधिकारी, सरकारी वकील यांनी बैठकीत सहभाग घेतला.
४२ हून अधिक गुन्ह्यांची नोंद- मराठवाड्यातील उद्योग क्षेत्रात बडे प्रस्थ असलेल्या सुरेश कुटे यांची ज्ञानराधा मल्टीस्टेट पथसंस्था नोव्हेंबर २०२३ मध्ये अडचणीत आली. या पतसंस्थेवर प्राप्तिकर विभागाच्या छाप्यानंतर तीन लाख ७० हजार ठेवीदार, खातेदारांचे ३७०० कोटी रुपये या पतसंस्थेत अडकले आहेत. या प्रकरणात या पतसंस्थेवर ४२ हून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ५० शाखांचे मागच्या वर्षीचा ऑक्टोबर महिन्यापासून आर्थिक व्यवहार ठप्प असल्याचं सांगितलं जातंय. ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातील इंदोर आणि अन्य ठिकाणी ५० शाखा असून साडेसहा लाख खातेदार आहेत.

.................

### बनावट जातवैधता प्रमाणपत्र प्रकरणी नऊ जणांना अटक : अशोक उईके

आला आहे.व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शिक्षण संस्थेने अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या वैधता प्रमाणपत्राशिवाय अर्जदारांना अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश देऊ नये. माननीय सर्वोच्च न्यायालय आदेशाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत असेही आदिवासी विकास मंत्री यांनी उत्तरात स्पष्ट केले.

................

### कंत्राटदारांकडून ४० टक्के कमिशनचा महायुतीचा पायंडा?

डिझाईनवर आक्षेप नसून कंत्राट देताना आणि काम करताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले का, सिमेंट-वाळूसह इतर बाबींमध्ये भ्रष्टाचार झाला का, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. भाजप सरकारच्या काळात महाराष्ट्रात ४० टक्के कमिशनची चर्चा सातत्याने होत आहे. जर त्यात तथ्य असेल, तर मिसिंग लिंक प्रकल्पही त्यातून सुटला नाही का, याची चौकशी झाली पाहिजे. आमचे सरकार सत्तेत आल्यास या प्रकल्पाचे 'कॅग'मार्फत लेखापरीक्षण करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणू, असा इशारा चव्हाण यांनी दिला.

# समृद्धी महामार्गावर पाण्याच्या बाटलीत दारू ?

## वैजापूर पोलिसांची 'हॉटेल डरकामाई'वर कारवाई!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर :** समृद्धी महामार्गावरील एका हॉटेलमध्ये पाण्याच्या बाटलीत कथित देशी दारू मिसळून ती ग्राहकांना विकली जात असल्याचा एक खळबळजनक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला.या व्हिडिओची गंभीर दखल घेत वैजापूर पोलिसांनी गुरुवारी तातडीने घटनास्थळी धाव घेत धडक कारवाई केली. यामुळे महामार्ग परिसरात अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती पाण्याच्या बाटलीत छुप्या पद्धतीने देशी दारू मिसळून ती ग्राहकाला देताना स्पष्टपणे दिसत होती. हा व्हिडिओ समृद्धी महामार्गावरील वैजापूर तालुका हद्दीतील असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे जलद गतीने फिरवली. माहिती मिळताच वैजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी योगेश झाल्टे, किसन गवळी व इतर पथकाने महामार्गालगत असलेल्या 'हॉटेल डरकामाई' येथे तातडीने छापा टाकला. पोलिसांच्या पथकाने संपूर्ण हॉटेलची बारकाईने झडती घेतली.या तपासणी दरम्यान तिथे कोणतीही अवैध दारू किंवा आक्षेपार्ह साहित्य मिळून आले नाही. जरी छाप्यात दारू सापडली नसली, तरी तपासादरम्यान हे हॉटेल कोणत्याही आवश्यक शासकीय परवानगीशिवाय विनापरवाना अनधिकृतपणे सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या गंभीर बाबीची दखल घेत पोलीस निरीक्षक ताईतवाले यांनी हॉटेल चालकाला हॉटेल तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले. तसेच यापुढे बेकायदेशीरपणे व्यवसाय सुरू ठेवल्यास थेट कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.हॉटेलच्या शेजारीच असलेल्या पेट्रोल पंपाच्या बाजूला समृद्धी महामार्गाला लागून एक खुला मार्ग असल्याचे पोलिसांना आढळले. या छुप्या मार्गाचा वापर संशयास्पद हालचालींसाठी किंवा अवैध वाहतुकीसाठी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी पेट्रोल पंप चालकाला तो मार्ग तातडीने बंद करण्याचे आदेश दिले. आदेश मिळताच सुरक्षेच्या दृष्टीने त्या ठिकाणी लोखंडी जाळी बसवून तो मार्ग पूर्णपणे सील करण्यात आला आहे.

**पोलिसांचा कडक इशारा**
व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी अवघ्या काही तासांत केलेल्या या जलद कारवाईमुळे समृद्धी महामार्ग परिसरातील अवैध कृत्यांना चाप बसला आहे. महामार्गाच्या सुरक्षिततेला बाधा आणणारे किंवा बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक आणि थेट कारवाई सुरू राहील, असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

### बोगस लग्न करणाऱ्या टोळीचा तरुणाला चार लाखांना गंडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**जालना :** बोगस विवाह लावून देत आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीने जालना आणि संभाजीनगर जिल्ह्यानंतर आता अहिल्यानगर जिल्ह्यातही शिरकाव केल्याचा प्रकार समोर आला आहे. शेवगाव तालुक्यातील एका युवकाची खोटे लग्न लावून देण्याच्या बहाण्याने तब्बल चार लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची तक्रार शेवगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.
तक्रारदार ज्ञानेश्वर महादेव कडूळे (रा. बालमटाकळी, ता. शेवगाव) हे कामानिमित्त नेवासा परिसरात गेले असता त्यांची ज्ञानदेव मिरगे (रा. जातेगाव, ता. वैजापूर) यांच्याशी ओळख झाली. मिरगे यांनी लग्नासाठी योग्य मुलगी असल्याचे सांगून तिचे आई-वडील नसून मावशीने तिचा सांभाळ केल्याची माहिती दिली. त्यानंतर मुलीची मावशी ज्योती राजू गायकवाड, मानलेली आजी सुमनबाई साबळे आणि ज्ञानदेव मिरगे यांनी मध्यस्थी करत विवाहासाठी चार लाख रुपये रोख देण्याची मागणी केल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.
यानंतर जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील नळणी बुद्रुक येथील कविता दामू बर्डे हिच्याशी शेवगाव तालुक्यातील आंतरवाली येथे विवाह लावून देण्यात आला. मात्र विवाहानंतर अवघ्या दोन दिवसांत संबंधित नवरी कोणालाही न सांगता माहेरी, मावशीकडे निघून गेली. त्यानंतर संपर्कही तुटल्याने आपली फसवणूक झाल्याचे तक्रारदाराच्या लक्षात आले.
या प्रकरणी ज्ञानेश्वर कडूळे यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून संबंधितांनी खोटा विवाह जमवून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### गंगापूर पोलिसांचा अवैध धंद्यांवर धडाका,
## जुगार अड्डे उद्ध्वस्त, वाळू माफियांनाही दणका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर :** गंगापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांविरोधात सुरू करण्यात आलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. अवघ्या २४ तासांत मटका, पत्त्यांचा जुगार, सुरट जुगार, अवैध दारू विक्री आणि वाहतूक नियमभंग अशा पाच गुन्ह्यांमध्ये कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय नेवरगाव परिसरात सुमारे ३०० ब्रास अवैध वाळू साठा शोधून त्याची माहिती महसूल विभागाला देण्यात आली आहे. पोलीसांनी प्रथम शहरातील मटका अड्ड्यावर छापा टाकत गुन्हा क्रमांक ३५५/२०२६ दाखल केला. या कारवाईत बुकी, मालक व एजंट अशा सर्व संबंधित आरोपींवर कारवाई करण्यात आली असून २५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर कायगाव शिवारात सुरू असलेल्या 'झन्ना-मन्ना' पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून चार जणांना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी व इतर साहित्य असा १ लाख ४ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



याच दिवशी भेंडाळा येथे सुरू असलेल्या सुरट जुगार अड्ड्यावर छापा टाकत पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १ लाख १ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मांजरी शिवारात एका व्यक्तीकडून विनापरवाना देशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी छापा टाकून २ हजार रुपयांचा देशी दारूचा साठा जप्त केला. तसेच मोटार वाहन कायद्यान्वये एका वाहनचालकाविरुद्धही स्वतंत्र कारवाई करण्यात आली. दरम्यान, नेवरगाव परिसरात अवैध वाळू साठ्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी तातडीने परिसराची पाहणी केली. सुरुवातीला सुमारे १०० ब्रास वाळू आढळून आली. त्यानंतर संपूर्ण परिसराची तपासणी केली असता एकूण सुमारे ३०० ब्रास वाळूचा अवैध साठा आढळून आला. याबाबतची लेखी माहिती तहसीलदारांना देण्यात आली असून पुढील महसुली कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वरील सर्व कारवाई मध्ये सपोनी विठ्ठल झाजुर्णे, पाटील पोलीस उपनिरीक्षक अनिल झोरे हेड कॉन्स्टेबल रमेश जोरवाल, भागवत खाडे ,विठ्ठल जाधव, पदम जाधव, आधी पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या धडक कारवाईमुळे गंगापूर तालुक्यात अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आगामी काळातही अशाच कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलीस निरिक्षक सलीम चाऊस यांनी दिला आहे.

**Change In Name**
my old name was
NIRMALA
RANGNATH DHERE
my new name is
NIRMALA
RANGANATH DHERE
Change Of Name
it will be used for
all future purpose

**नावात बदल**
माझे शाळेच्या दाखल्यावर नाव **संजीदा सुभानखाँ** असे झाले आहे आणि आधार कार्डवर **संजिदा जेकम मेव** असे आहे. माझे खरे बरोबर नाव **संजीदा जेकम मेव** असे आहे या दोन नावाच्या दोन व्यक्ती नसून मी एकच व्यक्ती आहे.
प्रतिज्ञापत्र क्र
२५५२२४२०४१२६८१००६४६७२४
दिनांक ३१/१२/२०२५

**नावात बदल**
माझे शाळेच्या दाखल्यावर नाव **मौ. जेकम** असे झाले आहे आणि आधार कार्डवर **जेकम जमील अहमद मेव** असे आहे माझे खरे बरोबर नाव **जेकम जमीलअहमद मेव** असे आहे. या दोन नावाच्या दोन व्यक्ती नसून मी एकच व्यक्ती आहे.
प्रतिज्ञापत्र क्र
२५५२२४२०४१२६८१००६४६७१७
दिनांक ३१/१२/२०२५

**Change In Name**
I, SHAIKH SHABBIR RAJJAK , hereby declare that my name appears as Sheikh Shabbir Rajjak on my Aadhaar Card, whereas due to a spelling error, it appears as Sheikh Shabbir Razzak on my Passport. I further declare that both the above names refer to one and the same person.
Affidavit number : 2652242061268100221599.

**Change In Name**
I HAVE CHANGE MY OLD NAME
TAMBOLI ASHIB ALLABAKSH
(LEAVING CERTIFICATE)
(BEFORE NAME)
TO THE NEW NAME AS
ASIF ALLABAKSH TAMBOLI
( AADHAR No. 8953 8326 6963)
FROM VIDE AFFADAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE – SHRIRAMPUR
DATE – 09/07/2026

**जाहीर नोटीस**
ॲड.जी.एम. निकम
ॲडव्होकेट, नेवासा कोर्ट,
प्रो.फि. /-
निशाणी नंबर : ८
नेमलेली तारीख : ०६/०८/२०२६
नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब सि.डी
यांचे कोर्टात
एच.एम.पी.नं.२७/२०२६
**अर्जदार**
पंकज हनुमंत घाडगे
**सा.वाली**
सौ. कावेरी पंकज घाडगे
जाहिर समन्स
नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब सि.डी यांचे न्यायालयात एच.एम.पी.नं.२७/२०२६ अर्जदार याने सा.वाली विरुध्द हिंदु विवाह कायदा कलम १३ (१)(ia) प्रमाणे घटस्फोट मिळणेसाठी दाखल केलेला आहे. यातील सा.वाली सौ. कावेरी पंकज घाडगे, ह. मु.द्वारा. सुदाम गंगाधर गायकवाड, रा. कुक्कडगाव, पो.सुकापुरी, ता.अंबड, जि. जालना, मो. नं.९३२२८५८३४७ हिस बऱ्याच वेळा वेळोवेळी तिच्या राहत्या पत्त्यावर समन्स काढुनही मिळुन आलेली नाहीत व ती अर्जात व मे. कोर्टात हजर ही झालेले नाहीत म्हणुन तुम्ही कोर्टात हजर रहावे म्हणुन तुम्हास या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येत आहे.
त्याअर्थी सा.वाली सौ. कावेरी पंकज घाडगे, ह. मु. द्वारा. सुदाम गंगाधर गायकवाड, रा. कुक्कडगाव, पो. सुकापुरी, ता. अंबड, जि. जालना, मो.नं. ९३२२८५८३४७ हिस दैनिक राष्ट्र सह्याद्री जालना आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये जाहीर समन्स काढण्यात यावे.
तरी या जाहिर समन्सने कळविण्यात येत की,
सा.वाली सौ. कावेरी पंकज घाडगे, ह.मु.द्वारा. सुदाम गंगाधर गायकवाड, रा. कुक्कडगाव, पो. सुकापुरी, ता.अंबड, जि. जालना, यांनी तुमच्या माहितगार इसमामार्फत किंवा वकिलामार्फत या न्यायालयात दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ
स्तर नेवासा यांचे कोर्टात एच.एम.पी.नं. २७/२०२६ मध्ये हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपणाविरुध्द योग्य तो हुकूम करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी. आज दि.०७/०७/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.
नेवासा
नेमलेली तारीख : ०६/०८/२०२६
शिक्का
**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, नेवासा**
**हुकूमावरुन अधिक्षक दि. न्यायालय क. स्तर नेवासा**

### मुळा कारखान्याच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा कामगार युनियनकडून सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**सोनई ।** मुळा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी भाऊसाहेब मोटे आणि व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब पाटील यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर राष्ट्रीय साखर कामगार युनियनच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कामगार व कर्मचाऱ्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. मुळा उद्योग समूहाचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री शंकरराव पाटील गडाख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड प्रक्रिया पार पडली. कारखान्याच्या सर्व संचालकांच्या उपस्थितीत भाऊसाहेब मोटे आणि



बाळासाहेब पाटील यांच्या नावावर एकमत झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर आयोजित सत्कार समारंभात व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यात समन्वय राखून कारखान्याच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविणे, विकासकामांना गती देणे आणि कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, या बाबींवर नूतन नेतृत्वाकडून विशेष भर दिला जाईल, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली. या सत्कार समारंभाला ज्येष्ठ नेते विश्वास मामा गडाख, बाळासाहेब नवले, राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार, सरचिटणीस डी. एम. निमसे, उपाध्यक्ष कारभारी लोंढे, खजिनदार सुभाष सोनवणे, सहचिटणीस भारत पटारे, कामगार संचालक विश्वास डेरे, किशोर राजगुरू यांच्यासह युनियनचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापन व कामगार यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ करण्यासाठी अशा सन्मान सोहळ्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नूतन पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली मुळा सहकारी साखर कारखाना प्रगतीची नवी उंची गाठेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## ट्रक आणि बसची धडक, सहा जणांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**जालना :** जालना जिल्ह्यात मठतांडा गावाजवळ आज एक एसटी बस आणि ट्रकची टक्कर होऊन झालेल्या अपघातात सहाजण ठार, तर २३ जण जखमी झाले. जालना-वडीगोद्री महामार्गावर सकाळी साडेआठच्या सुमाराला हा अपघात झाला. ही बस गेवराईहून जालन्याकडे निघाली असताना, समोरुन येत असलेला ट्रक या बसला धडकला.त्यात बसचा वाहक आणि तीन प्रवासी, तसंच ट्रकचा चालक, आणि वाहक, असे सहाजण जागीच ठार झाले. जखमींपैकी १३ जणांवर जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.




## देवळाली प्रवरात संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी :** नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील प्रस्थान ठेवून पंढरिकडे संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पायी पालखी सोहळ्याचे देवळाली प्रवरा शहरात आगमन होताच भक्तिमय वातावरणात राहुरी व देवळाली प्रवरा प्रशासनाच्या वतीने वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. प्रारंभी राहुरी तालुक्यात आगमन होताच हद्दीच्या ठिकाणी तहसीलदार डॉ.अमित पवार, पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांनी स्वागत केले. त्यानंतर आंबी फाटा येथे चव्हाण कुटूंबियांनी स्वागत केले.
देवळाली प्रवरा शहरात भक्तीमय वातावरणात पालखीचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून स्वागत करण्यात आले. यावेळी गटनेते तथा नगरसेवक प्रकाश संसारे, माजी नगराध्यक्ष मुरलीधर कदम, नगरसेवक अमोल कदम, डॉ. प्रवीण कोठुळे मुख्याधिकारी ऋषीकेश पाटील, मंगेश ढुस, तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''जय जय राम कृष्ण हरी''



या नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. देवळाली प्रवरा हनुमान मंदिरात पालखीने विसावा घेतला असता भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने देवळाली प्रवरा प्राथमिक आरोग्य केंद्र व शहरातील डॉक्टरांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधांचे वाटप करण्यात आले. तसेच आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहतूक नियोजन आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून पालखी सोहळा सुरळीत पार पडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
शुक्रवार दि .१०जुलैं २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत
१४५ २३० ५५० ०-३ १२० ६९० ३३७
जोड ९३-२४-८४-३५-३९

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत
१३० ६८० ७०७ ४-५ १४० २३० ७८०
जोड ४८-३१-०९-५२-१३

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत
१२५ ४८६ ४४० ८-९ १२६ ४५० २४०
जोड ०९-८५-२१-४३-९७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# द • ख • ल

## आशा स्वयंसेविका, कर्मचाऱ्यांना बीएलओ कामातून सुट मिळावी : ॲड. सुभाष लांडे



**शेवगाव :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांना नव्याने बीएलओ व एसआयआरचे काम दिल्याने त्यांच्यावर कामाचा ताण निर्माण झाला असल्याने त्यांना बीएलओ व एसआयआर कामातून सूट मिळावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी केली आहे. आशा कर्मचारी संघटना आयटक यांच्या वतीने गुरूवारी शेवगावचे तहसिलदार आकाश दहाडदे व पंचायत समितीचे तालुका वैद्यकिय अधिकारी यांना ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा स्वच्छता समिती सचिव पदाचा राजीनामा व तो स्वीकारण्याबद्दलचे निवेदन भाकपचे राज्य सचिव तथा आशा कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लांडे व तालुका अध्यक्ष संदिप इथापे यांच्या उपस्थित देण्यात आले. यावेळी विद्या नजन, वैशाली भुतकर, आशा तुतारे, सुनिता ईसरवाडे, अंजली भुजबळ, प्रतिभा गरड, मीनाक्षी मगर, हिरा पठाडे, सुमित्रा महाजन, अनिता भुजबळ, सुवर्ण साळुंखे, उषा ब्राह्मणे, अलका कोरडे, सुनीता पावशे ,चंद्रकला खुडे, कमल तोळणे, जागृती गवारे, सुनीता देवडे, लता आव्हाड, संगीता पिसोटे, सुवर्ण साळुंखे, शोभा पंडित, मंदा नांगरे, बेबी थोरात, स्वाती रसाळ, अस्मिता माळी, मंगल डुरे, आशा काकडे, रत्नमाला शिरसागर, रेणुका म्हस्के, विद्या बडढे, अश्विनी तुतारे, स्वाती गाडेकर, क्रांती थोरात, पुनम आगलावे, शोभा नाकाडे, विश्रांती खामकर, विजया जाधव, उषा थोरात, सविता हजारे, रविता खोसे, वनिता खर्चन, संगीता भुजबळ, सुमन खंडागळे, उषा भराट आदी आशा व प्रवर्तक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मारुतराव घुले पाटील सर्वसामान्यांचे नेते : इंगावले




**अमरापूर :** श्री मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेच्या दहेश्वर माध्यमिक विद्यालय, दहिफळ जूने येथे लोकनेते, सहकारमहर्षी कै. मारुतरावजी घुले पाटील यांच्या २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी मारुतरावजी घुले पाटील हे सर्वसामान्यांचे खरे नेते होते, असे प्रतिपादन इंगावले यांनी केले. अध्यक्षीय समारोपात नंदू पा. भोसले यांनी मारुतरावजी घुले पाटील यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या समाजसेवेचा वारसा जपण्याचे आवाहन केले. याप्रसंगी कु. साक्षी विखे, सारिका जाधव, संचिता काटे आणि दळवी यांनी मनोगत व्यक्त करून लोकनेत्यांना अभिवादन केले. यावेळी बाळासाहेब तुपविहिरे, प्रमिला बोडखे, विशाल जोशी, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे, शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## बेलवंडी ग्रामपंचायतीचा 'मियावकी' पॅटर्न कौतुकास्पद : गुंजाळ



**बेलवंडी :** पर्यावरण संवर्धन आणि गावाच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी बेलवंडी बुद्रुक ग्रामपंचायतीने राबवलेला 'मियावकी' (आनंद घनवन) वृक्षारोपणाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि आदर्शवत आहे, असे गौरवोद्गार जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी काढले. बेलवंडी येथील मियावाकी वन लागवड क्षेत्राला त्यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. रस्त्याने जात असताना बेलवंडी ग्रामपंचायतीने अत्यंत देखणे आणि नियोजनबद्ध पद्धतीने उभारलेले हे 'आनंद घनवन' पाहून आपला तिथे भेट देण्याचा मोह आवरला नाही, असे सांगत गुंजाळ यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती घेतली. एका छोट्याशा जागेत निसर्गाची देखणी प्रतिकृती तयार करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी पाणीपुरवठा अधिकारी देसले, श्रीगोंदा तालुक्याच्या गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी हराळ मॅडम, एपीआय नंदकुमार सोनवलकर, बेलवंडीचे सरपंच ऋषिकेश शेलार, उपसरपंच बाळासाहेब ढवळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे, साहेबराव शेलार, सोपान हिरवे, कैलास राऊत, यांच्यासह गावातील अनेक आजी-माजी पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहीत्य वाटप



**कासार पिंपळगाव :** 'सहकार' म्हणजे समान आर्थिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र आलेल्या लोकांची लोकशाही पद्धतीने चालवली जाणारी स्वायत्त संस्था 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या संत विचारांवर आधारलेली ही संकल्पना मुख्यत्वे आर्थिक आणि सामाजिक दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी काम करते.सामाजिक एकता, आर्थिक विकास आणि परस्पर विश्वास वाढीस लागून दुर्बल घटकांना बळ मिळते. सहकार हा भांडवलवाद आणि समाजवाद यांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा मानला जातो. दुर्बल घटकांना व शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत करते. असे मत ज्येष्ठ नेते अर्जुनराव राजळे यांनी व्यक्त केले. पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर व कासार पिंपळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १३९ विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह निमित्त ग्रंथपुस्तके व शैक्षणिक साहीत्य वाटप करुन सहकाराची ओळख विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पाथर्डी आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.यांनी केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष आदिनाथ नागरी सह पतसंस्था प्रमुख अर्जुन दादाबा राजळे होते. यावेळी गोकुळ नांगरे, सय्यद मॅडम, तुषार तुपे, राऊत तसेच इतर शिक्षक कर्मचारी कार्यक्रमास सचिन रासने, संचित कुलकर्णी विष्णु चितळे, वैभव राजळे उपस्थित होते.

# सामूहिक रजा टाकून शिक्षक रस्त्यावर...

### अन्यायकारक धोरणे तातडीने मागे घेण्याची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कार्यरत शिक्षकांवर लादण्यात आलेली टीईटीची अनिवार्यता, पदोन्नती प्रक्रियेतील अन्यायकारक अटी, संचमान्यतेचे जाचक धोरण, बीएलओच्या अशैक्षणिक कामाची सक्ती तसेच इतर शिक्षकविरोधी निर्णयांविरोधात अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी जिल्ह्यातील शिक्षकांनी सामूहिक रजा टाकून मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालया समोर करण्यात आलेल्या आंदोलनाने संपूर्ण परिसर शिक्षक, शिक्षकेतरांच्या घोषणांनी दणाणला. या आंदोलनास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. आंदोलनात समन्वय समितीचे अध्यक्ष सुनिल पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, बबन गाडेकर, दत्तात्रय कुलट, प्रकाश नांगरे, संतोष दुसुंगे, नारायण पिसे, ज्ञानदेव बेरड, सचिन झगडे, अमोल ठाणगे, प्रसाद शिंदे, मनिषा वाकचौरे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विलास पेद्राम आदींसह शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी राज्य शासनाच्या शिक्षणविषयक धोरणांमुळे शिक्षकांचे मानसिक, शारीरिक आणि व्यावसायिक खच्चीकरण होत असल्याचा आरोप केला. शासन सातत्याने शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करत असून, वारंवार लोकशाही मार्गाने निवेदने, बैठका आणि पाठपुरावा करूनही कोणताही सकारात्मक निर्णय घेतला जात नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात शासनाच्या धोरणाचा निषेध नोफ्लदवला.

समन्वय समितीच्या निवेदनात नमूद करण्यात आले की, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या सेवेशी संबंधित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शासनाचे अलीकडील निर्णय शिक्षकांसाठी अत्यंत जाचक ठरत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरही होत आहे.

१४ मे २०२६ रोजी शिक्षण संचालकांनी विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया सुरू करण्याबाबत काढलेले पत्र तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. या पत्राच्या आधारे ज्या जिल्ह्यांमध्ये पदोन्नती प्रक्रिया पार पडली असेल तीही रद्द करून नव्याने न्याय्य निकषांवर प्रक्रिया राबवावी, अशी भूमिका शिक्षकांनी मांडली.

सन २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या आणि अनेक वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याची सक्ती अन्यायकारक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी नियमांत शिथिलता द्यावी किंवा त्यांच्यासाठी स्वतंत्र टीईटी परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

## वडझिरेत सद्गुरु बाबाजी चैतन्य महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



छाया : दत्ता गाडगे

**पारनेर :** सद्गुरु बाबाजी चैतन्य महाराज श्रीक्षेत्र उत्तमापूर अर्थात,ओतूर येथील पायी दिंडी पालखी सोहळा पारनेर तालुक्यातील वडझिरे या ठिकाणी आल्यानंतर त्याचे भव्य स्वागत ग्रामस्थांच्या वतीने जल्लोषात करण्यात आलं. या पायीदिंडी पालखी सोहळ्यामध्ये हजारोंच्या संख्येने वारकरी भाविक भक्त उपस्थित होते.

लोकवर्गणीच्या माध्यमातून हा पायी दिंडी पालखी सोहळा दरवर्षी पंढरपूरला जात असतो. सलग ६६ वर्ष तह हयात हा पायीदिंडी पालखी सोहळा पंढरपूरला जात असतो. श्रीक्षेत्र ओतूर येथून ह्या पायी दिंडी पालखी डोळ्याचे ३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता प्रस्थान झाले. आणि हा पायी दिंडी पालखी सोहळा दिनांक ६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता पारनेर तालुक्यातील वडझिरे गावामधे आगमन झाले.

पालखी सोहळा गावात आल्यानंतर या दिंडी सोहळ्यामध्ये ज्ञानोबा माऊली तुकाराम असा एकच जयघोष करण्यात आला. कितीही मोठ्या प्रमाणात पाऊस असला तरी वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरती हसू पंढरीच्या पांडुरंगाचे आस लागलेली दिसत होती. पावसाला प्रजन्य राजाला न घाबरता वारकरी अगदी तल्लीन होऊन मोठ्या संख्येने हजारोंच्या संख्येने या दिंडी सोहळ्या सोबत नाचत होता.

सद्गुरु बाबाजी चैतन्य महाराज हे संत तुकाराम महाराजांचे गुरु आणि त्यांचा पाय दिंडी सोहळा वडझीरे गावामध्ये आल्यानंतर गावातील महिलांच्या वतीने पालखीचे पूजन करण्यात आले. तसेच गावामध्ये आल्यानंतर ग्रामस्थ व भाविक भक्त वारकरी यांच्या उपस्थितीमध्ये महाआरती झाली.या दिंडी सोहळ्यामध्ये भावीक भक्त मोठ्या भक्ती भावामध्ये अभंग आणि गवळणी गात असताना दिसले.राज्यांमधून येणाऱ्या प्रमुख दिंड्यांपैकी सद्गुरु बाबाजी चैतन्य महाराज पायी दिंडी पालखी सोहळा ओतूर, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील ही दिंडी आहे. गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच वडझिरे गावातील मुख्य वेशीजवळ दिंडी सोहळा आल्यानंतर भाविकभक्त आणि गावकऱ्यांनी एकच जल्लोष केला. महिला भावीक भक्त यांनी फुगड्या खेळण्याचा आनंद लुटला. आरतीचा कार्यक्रम झाल्यानंतर सर्व वारकरी भावीक भक्तांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. सायंकाळी कीर्तनाचा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला होता.

## शांत, सात्विक मनासाठी योग हाच प्रभावी मार्ग : डॉ. मालपाणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** योगाचा समावेश प्रत्येकाने दैनंदिन जीवनात खेळ म्हणून करायला हवा. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक उन्नती साध्य होते. शांत व सात्विक मन जीवनातील प्रत्येक आव्हानाला समर्थपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य देते आणि असे मन घडविण्यासाठी योग हा सर्वात प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ चिकित्सक डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

मुंढे चौक येथील चैतन्य हॉस्पिटलशेजारी सुरू करण्यात आलेल्या संवेदना योग केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. मालपाणी म्हणाले, योगाच्या माध्यमातून श्वासाचे विज्ञान समजून घेता येते. योग हे भारताला लाभलेले अत्यंत प्राचीन शास्त्र असून हे मौल्यवान ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यावेळी तारुसेठ भंडारी, डॉ. सुभाषचंद्र बाहेती, प्रा. लक्ष्मण बिटाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान डॉ. मालपाणी यांनी विद्यार्थ्यांकडून योगाची प्रात्यक्षिके सादर करून घेऊन उपस्थितांना विविध योगासने व प्राणायामाचे महत्त्व समजावून सांगितले.

## शासकीय कामात अडथळा : गुन्हा दाखल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** वैदुवाडी परिसरात एका गुन्ह्याच्या तपासासाठी आणि घरझडतीसाठी गेलेल्या पोलीस पथकावर काही महिलांनी हल्ला करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस कर्मचारी छाया कैलास गायकवाड यांनी या संदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एका गुन्ह्यातील अटक आरोपी नितीन मच्छिंद्र शिंदे आणि विशाल संतोष शिंदे यांना सोबत घेऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक वैदुवाडी येथे तपास करण्यासाठी गेले होते. पोलीस पथक आरोपींच्या घराची झडती घेणार तितक्यात तेथे पाच ते सात महिलांचा बेकायदेशीर जमाव गोळा झाला. तुम्ही आमच्या माणसांना का अटक केली आणि आमच्या परिसरात तपासाला का आले? असे म्हणून या महिलांनी पोलिसांशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर या जमावलेल्या महिलांनी सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व झटापट केली. एवढेच नव्हे तर पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपींना बळजबरीने पळवून नेण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. या गोंधळात आरोपी नितीन शिंदे याचा पोशाखही फाटला. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी पोलिसांनी घटनास्थळावरून निकीता निखिल शिंदे या २५ वर्षीय महिलेला ताब्यात घेतले. तिची चौकशी केली असता, तिने गुन्ह्यात सोबत असलेल्या इतर महिलांची नावे शांताबाई मच्छिंद्र शिंदे आणि अश्विनी सुरज शिंदे अशी असल्याचे सांगितले. या प्रकरणी छाया गायकवाड यांच्या फिर्यादीवरून निकीता शिंदे, शांताबाई शिंदे, अश्विनी शिंदे आणि इतर तीन ते चार अज्ञात महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एकशिंगे करत आहेत.

## हॉटेल सगम व सत्कारच्या कारवाईनंतर आता मिठाई विक्रेत्यांवर वक्रदृष्टी

### अन्न व औषध प्रशासनाची धडक मोहीम

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** श्री क्षेत्र शिर्डी येथील साईबाबांच्या मंदिर परिसरात प्रसाद म्हणून भेसळयुक्त पेढ्यांच्या दुकानांवर कारवाई केल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासनाने आपला मोर्चा अहिल्यानगर शहराकडे वळविला आहे. दोन दिवसांपूर्वीच शहरातील हॉटेल सगम व सत्कार यांची तपासणी करून अस्वच्छतेच्या कारणासह इतर त्रुटी आढळल्याने या दोन्ही हॉटेलचे परवाने निलंबित करण्यात आले. दरम्यान या कारवाईनंतर आता अन्न व औषध प्रशासनाने आपला मोर्चा मिठाई विक्रेत्यांकडे वळविला आहे. शहरातील बाजारपेठेतील मिठाई विक्रेत्यांची तपासणी करून भेसळयुक्त मिठाई विक्री करणाऱ्या मिठाई विक्रेत्यांवर थेट कारवाई केली जाणार आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील हॉटेल व्यवसायिक व मिठाई विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईच्या व्यवसायिकांनी धसका घेतला असून हॉटेलच्या स्वच्छतेकडे लक्ष केंद्रित केले आहे. गेल्या महिनाभरा पासुन प्रशासनाने नगर शहरासह जिल्ह्यात सुंगधि तंबाखु, गुटका विक्रेंत्याकडे छापा सत्र सुरू केल्याने पांनटपरी चालकांमध्ये पळापळ सुरू झाली आहे. गुरूवारी शेवगाव शहरात स्थानिक गुन्हे शाखेचा पोलिस पथकाने छापा टाकुन सुंगधी तंबाखु व तयार केलेल्या मावा असा मोठा साठा जप्त केला आहे. हॉटेल व्यावसायीकां पाटोपाट अवैद्य धंद्यावर कारवाई सुरू झाल्याने एकच घबराट पसरली आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी ठरावांचे 'राजकारण' तापले!

### १६ जुलैपूर्वी ठरावासाठी श्रीगोंद्यात मोर्चेबांधणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी १६ जुलैपर्यंत मतदानाचा अधिकार निश्चित करणारे ठराव जिल्हा बँकेत सादर करण्याची अंतिम मुदत असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील सहकार क्षेत्र अक्षरशः ढवळून निघाले आहे. विविध कार्यकारी सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ, खादी ग्रामोद्योग संस्था, सहकारी साखर कारखाने, पतसंस्था, मत्स्य संस्था, मजूर संस्था, पाणी वापर संस्था, दूध डेअरी व दूध संघ अशा सर्वच संस्थांमध्ये ठरावासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. यंदा प्रत्येक संस्थेला नियमित सभासदाच्या नावे मतदानाचा अधिकार देणारा ठराव करावा लागणार असल्याने संचालक मंडळाचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. परिणामी इच्छुक उमेदवारांकडून संचालकांची मनधरणी, भेटीगाठी आणि राजकीय समीकरणे जुळविण्याचे प्रयत्न शिगेला पोहोचले आहेत.

तालुक्यात काही ठिकाणी ठराव आपल्या बाजूने करून घेण्यासाठी विविध आमिषे दाखविली जात असल्याची जोरदार चर्चा आहे. काही संचालकांना सहलीवर पाठविण्यात आल्याची, तर काही ठिकाणी कोरडा शिधा वाटप झाल्याच्या चर्चांनी सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी त्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे.

दरम्यान, अनेक संस्थांमध्ये ठरावावरून संचालकांमध्येच मतभेद उफाळून आले असून काही ठिकाणी बैठका वादळी ठरत आहेत. १६ जुलैची अंतिम मुदत जवळ येत असल्याने पुढील काही दिवस सहकाराच्या राजकारणात आणखी मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**ठरावासाठी कोणत्या संस्था मैदानात?**

- विविध कार्यकारी सहकारी संस्था
- खरेदी-विक्री संघ
- सहकारी साखर कारखाने
- पतसंस्था
- मत्स्य संस्था
- मजूर संस्था
- पाणी वापर संस्था
- दूध डेअरी व दूध संघ
- खादी ग्रामोद्योग संस्था

# माळीवाडा वेशीचे संरक्षण करावे

### न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्देश, शिवसैनिकांचा जल्लोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहराच्या ऐतिहासिक वैभवाचे प्रतीक असलेल्या माळीवाडा वेशीचे संरक्षण करावे, असे महत्त्वपूर्ण निर्देश छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिले आहेत. शिवसेना गटनेते दत्तात्रय (दत्ता) कावरे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीनंतर न्यायालयाने हा आदेश दिला. या निर्णयाचे शहरभर स्वागत होत असून, माळीवाडा वेस परिसरात शिवसैनिक व नागरिकांनी जल्लोष साजरा केला.

महापालिका प्रशासनाने वाहतुकीच्या कारणास्तव माळीवाडा वेस पाडण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावानंतर शहरात विविध मतप्रवाह निर्माण झाले. काहींनी वेस पाडण्यास समर्थन दिले, तर इतिहासप्रेमी नागरिक, विविध सामाजिक संस्था आणि शिवसेनेसह अनेक संघटनांनी ही ऐतिहासिक वास्तू जतन करण्यासाठी जोरदार भूमिका घेतली होती.

या पार्श्वभूमीवर शिवसेना गटनेते दत्तात्रय कावरे यांनी छत्रपती संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली. याचिकेच्या सुनावणीदरम्यान ॲड. नारायण नरवडे, ॲड. माधव दुसुंगे आणि ॲड. कार्तिक कटारिया यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने माळीवाडा वेशीचे संरक्षण करण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे शहराच्या ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेल्याची भावना व्यक्त होत आहे.



न्यायालयाचा आदेश जाहीर होताच माळीवाडा वेस परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर पेढे वाटून आणि फटाक्यांची आतषबाजी करत शिवसैनिक व नागरिकांनी जल्लोष साजरा केला. या वेळी परिसरात ऐतिहासिक वारसा जपा अशा घोषणाही देण्यात आल्या.

या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शिवसेना गटनेते दत्तात्रय कावरे, विक्रम राठोड, परेश लोखंडे, भैरवनाथ वाकळे, चंद्रकांत ताठे, शिवाजी जाधव, नितीन भुतारे, बाळासाहेब पुंड, अनिल चेडे, बाबासाहेब घोडके, विनायक इंगळे, फारूक शेख, पियुष कोथिंबिरे, घनश्याम घोलप, संकेत तावरे, पंकज मेहेर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नऊ नागरिकांची सुखरूप सुटका; एकाचा मृत्यू

## मोशी कचरा डेपो दुर्घटना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर सुरू असलेल्या युद्धपातळीवरील बचावकार्यात आतापर्यंत ९ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. आज (दि. ९) सकाळी शोधमोहीमेदरम्यान बाहेर काढण्यात आलेल्या एका नागरिकाचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. अद्यापही आठ नागरिकांचा शोध घेण्याचे काम अविरतपणे सुरू आहे.

मोशी कचरा डेपो येथे बुधवारी दुपारी सुमारे दीड वाजता कचऱ्याचा ढीग प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने दुर्घटना घडली. त्यावेळी इमारतीमध्ये अंदाजे २३ नागरिक होते. यापैकी अशोक गुप्ता, मुनेंद्र कुमार, चंद्रशेखर सिंह, दिनेश सुतार आणि श्री बाला हे पाच नागरिक सुरुवातीलाच सुखरूप बाहेर पडले. उर्वरित १८ नागरिक इमारतीत अडकल्याने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल , भारतीय सेना, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अग्निशमन विभाग, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्तपणे तातडीने बचावकार्य सुरू केले.

बुधवारी रात्रीपर्यंत सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण आणि रणवीर सिंह या सहा नागरिकांना सुखरूप बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या बचावकार्यात विजय सपकाळ, भूषण पाटील आणि महेश राऊत या आणखी तीन नागरिकांची यशस्वी सुटका करण्यात आली. अशा प्रकारे बचावकार्यात एकूण नऊ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. दरम्यान, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या श्वान पथकाच्या मदतीने सुरू असलेल्या शोध मोहीमे दरम्यान आज सकाळी सुमारे ९ वाजता भावेश वाणी यांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले. गंभीर अवस्थेत त्यांना तातडीने पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीनंतर त्यांना मृत घोषित करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी दिली.सध्या घटनास्थळी अद्याप अडकलेल्या अंदाजे आठ नागरिकांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर बचाव आणि शोधमोहीम सुरू असून सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत.महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे तसेच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहून बचावकार्यावर सातत्याने देखरेख ठेवत आहेत. तसेच आज खासदार श्रीरंग बारणे यांनी घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या बचावकार्यासंदर्भात माहिती घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

## पालखी प्रस्थान सोहळ्यानंतर युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम- मुख्याधिकारी खांडेकर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर तसेच पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्यानंतर आळंदी नगरपरिषदेमार्फत संपूर्ण शहरात युद्धपातळीवर स्वच्छता व निर्जंतूकीकरणाची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे, अशी माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली आहे. पालखी सोहळ्यादरम्यान भाविकांना कोणताही त्रास होऊ नये तसेच वारकऱ्यांची मोठी गर्दी लक्षात घेऊन नगर परिषदेमार्फत मध्यरात्रीच्या वेळेत साफसफाई, कचरा संकलन व वाहतुकीची कामे सातत्याने करण्यात आली. ज्या ठिकाणी दिंड्या मुक्कामी होत्या, जर्मन हँगर उभारण्यात आले होते तसेच मोबाईल शौचालयांची व्यवस्था करण्यात आली होती, त्या सर्व ठिकाणांची तात्काळ स्वच्छता करून परिसर पूर्ववत करण्यात आला आहे.

सध्या शहरात मोठ्या प्रमाणावर कचरा संकलनाचे काम सुरू असून, अलीकडील पूरपरिस्थितीमुळे घाट परिसरात व नदीकाठावर साचलेला गाळ, कचरा व जलपर्णी हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी सुमारे ४०० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, जेसीबीच्या सहाय्याने घाट परिसरातील जलपर्णी व गाळ हटविण्याचे काम सुरू आहे.यासोबतच शहरात निर्जंतुकीकरणासाठी जंतुनाशक औषधे व बीएचसी (पावडर फवारण्यात येत असून, दुर्गंधी दूर करण्यासाठी आवश्यक औषधांचीही फवारणी करण्यात येत आहे. रस्त्यांवर साचलेला गाळ व कचरा हटवून अग्निशमन दलाच्या वाहनांच्या सहाय्याने रस्ते धुऊन स्वच्छ करण्यात येत आहेत.पूरामुळे अनेक दुकाने व व्यावसायिक आस्थापनांमध्ये गाळ साचला होता. अशा ठिकाणीही नगर परिषदेमार्फत स्वच्छता करण्यात येत असून, दुर्गंधी दूर करण्यासाठी ओडोफ्रेशसह आवश्यक औषधांची फवारणी केली जात आहे.



## अतिवृष्टीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जलदगतीने बचाव व मदत कार्य

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मावळ तालुक्यात दि. ५ व ६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी भूस्खलन, पूरसदृश्य परिस्थिती, रस्ते बंद होणे, घरांची पडझड, घरांमध्ये पावसाचे पाणी शिरणे, पशुधन व पिकांचे नुकसान तसेच नागरिक व पर्यटक अडकण्याच्या घटना घडल्या. या आपत्कालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य राबवून विविध ठिकाणी अडकलेल्या एक हजार १३७ नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर केले. दुर्दैवाने पाच नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यांच्या वारसांना शासन निर्णयानुसार अनुज्ञेय आर्थिक मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, मावळचे तहसीलदार विक्रम देशमुख यांनी तातडीने घटनास्थळी उपस्थित राहून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), पीएमआरडीए, लोणावळा व वडगाव नगरपरिषद, पोलीस, आपदा मित्र, वन्यजीव रेस्क्यू टीम, शिवदुर्ग टीम, स्थानिक ग्रामस्थ तसेच विविध प्रशासकीय यंत्रणांच्या समन्वयातून प्रभावी बचाव व मदतकार्य केले.

**भूस्खलनामुळे बाधित क्षेत्र :** मावळ तालुक्यातील मौजे पाटण येथे दि. ६ जुलै रोजी झालेल्या भूस्खलनाच्या दुर्घटनेत तीन नागरिकांचा मृत्यू झाला असून एक घर पूर्णपणे नष्ट झाले. मौजे खंडाळा येथील रस्टिक हायलँड सोसायटीमधील नॉर्थ पॉईंट हॉटेलमध्ये अडकलेल्या १४ पर्यटक व नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली. या परिसरातील आठ ते दहा बंगल्यांमध्ये माती व दगडांचा मोठ्या प्रमाणात मलबा शिरला असून येथे एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे.मौजे ताजे येथे सतर्कतेचा इशारा देऊन ५६ कुटुंबांतील ३०५ नागरिकांना जिल्हा परिषद शाळा व सज्जनवाडी येथील अंगणवाडीत उभारलेल्या निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले. मौजे भाजे येथील संपर्क शाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनाही तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षित निवारा केंद्रात हलविण्यात आले. दुधीवरे खिंड, तुंग-जवन रस्ता, आपटी, डाहुली, बऊर खिंड, चावसर घाट, कोळे-चाफेसर रस्ता तसेच तुंगार्ली-पांगळोली मार्गावर भूस्खलनामुळे माती व दगडांचा मलबा आल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. बलयन येथील स्मशानभूमीही मलब्याखाली गेली.

**पुरसदृश्य परिस्थितीत अडकलेल्या एक हजार १३७ नागरिकांचे स्थलांतर :** मौजे निगडे येथील गार ओढ्यात एक नागरिक वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. भांगरवाडी (लोणावळा) येथील हुडको सोसायटीतील सुमारे ५१० नागरिकांना सुरक्षित बाहेर काढून नगरपरिषदेच्या शाळेत स्थलांतरित करण्यात आले.

## पालखीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ५७ हिरकणी कक्ष-खंडागळे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराज महाराज पालखीच्या पार्श्वभूमीवर गरोदर व स्तनदा माता आणि लहान बालकांकरिता पुणे जिल्ह्यात एकूण ५७ हिरकणी कक्ष उभारण्यात आले असून याकरिता ७ बालविकास प्रक्लप अधिकारी, ५७ अंगणवाडी पर्यवेक्षिका, १९८ गणवाडी सेविकांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांनी दिली. या हिरकणीकक्षाअंतर्गत २ वर्षे पर्यतच्या बालकांसाठी बाळकृष्ण कोपरामध्ये राजगिरा, शेंगदाणा, मुरमुऱ्याचे लाडु फुटाणे, फळे, बिस्किट, ओरआरएस, ग्लुकॉन डी, खाऊ ठेवण्यासाठी बरण्या, कागदी डिश आदी, खेळणी संचामध्ये बॅट बॉल. खुळखुळा. बाहुली. मोठा बॉल व लहान मुलांची इतर आवश्यक खेळणी आदी, गरोदर व स्तनदा मातांना अल्हाददायी वातावरणासाठी बेड, गाद्या, बेडशीट. उश्या. उशीचे कव्हर, पार्टिशन साठी मोठे पडदे आणि नॅपकीन, प्रथमोपचार पेटी , पिण्याच्या पाण्याचे जार व ग्लास व सॅनेटरी पॅड या सुविधा आहेत. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या गरोदर व स्तनदा माता आणि लहान बालकांना हिरकणी कक्षांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. खंडागळे यांनी केले आहे.



## दादागिरी खंडणी, धमक्यांना शून्य सहनशीलता यादव यांचा स्पष्ट इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** : शिक्रापूर शहरातील व्यापाऱ्यांना सुरक्षित भयमुक्त आणि कायद्याचे संरक्षण असलेले वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या वतीने व्यापारी असोसिएशन व विविध व्यावसायिकांची समन्वय बैठक बुधवारी दि. ८ आयोजित करण्यात आली होती. बैठकीत व्यापाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेत त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन शिक्रापूर पोलिसांनी दिले असून.बैठकीत शहरातील बेकायदेशीर पार्किंग, फुटपाथवरील अतिक्रमणे, रस्त्यात उभ्या राहणाऱ्या रिक्षा व इतर वाहने, भाजी विक्रेते, विरुद्ध दिशेने येणारी वाहने, मोठ्या आवाजाचे सायलेंसर, अनधिकृत गतिरोधक, कंपन्यांच्या बसथांब्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, विनापरवाना लावलेले फ्लेक्स बोर्ड, अनधिकृत लाईट खांब, पानटपऱ्या आणि वाहतूक कोंडी अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.यावेळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी व्यापाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणतीही व्यक्ती दादागिरी करत असेल खंडणी अथवा पैशांची मागणी करत असेल धमक्या देत असेल किंवा बेकायदेशीर दबाव टाकत असेल तर त्याची तात्काळ माहिती पोलिसांना द्यावीअशा प्रकरणांमध्ये संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिला आहे. परिसरातील चोऱ्या रोखण्यासाठी नियमित पोलीस गस्त वाढविणे, वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे, अपघात टाळण्यासाठी नियोजन करणे तसेच व्यापाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती सर्व मदत २४ तास उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाहीही बैठकीत देण्यात आली.

## मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत खेळाडू निवड चाचणी १४ व १५ जुलै रोजी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत जिल्हास्तरीय क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी ॲथलेटिक्स, हॉकी आणि रोईंग या खेळांच्या खेळाडू निवड चाचण्यांचे आयोजन दि. १४ व १५ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे सकाळी १० वाजता ॲथलेटिक्स व हॉकीच्या निवड चाचण्या होणार आहेत. रोईंगची निवड चाचणी दि. १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोणी काळभोर येथे होईल.२५ वर्षांखालील महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पदकविजेते किंवा राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडू पात्र असून, निवड चाचणीसाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, मूळ कागदपत्रे, सत्यप्रती आणि तीन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी सुरेश काकड (८८८८८०६१५८), ज्योती सूर्यवंशी (९०७५०४०३२०), मनीषा माळी (७३९१९६८१९२) किंवा मनीषा दिवेकर (९७६४३८५१५२) यांच्याशी संपर्क साधावा.

## बारामतीकरांना दिलासा; उद्यापासून बारामती शहराचा दैनंदिन पाणीपुरवठा पूर्ववत सुरू..!

### उपमुख्यमंत्री पवार यांच्या पाठपुराव्यामुळे नीरा डाव्या कालव्याचे आवर्तन सुरु

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी असून, येत्या १० जुलै २०२६ पासून शहराचा दैनंदिन पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे नगराध्यक्ष सचिन सातव, मुख्याधिकारी पंकज भुसे, पाणीपुरवठा सभापती मनीषा समीर चव्हाण यानी दिली.

बारामती शहराचा पाणीपुरवठा हा नीरा डाव्या कालव्यातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर आधारित आहे. मात्र, कालव्याचे आवर्तन बंद असल्याने उपलब्ध पाणीसाठ्याचा नियोजनबद्ध व काटकसरीने वापर करण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून शहरात दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत होता. या काळात शहरातील नागरिकांनी पाण्याचा संयमाने व जबाबदारीने वापर करून पाणी बचतीस सहकार्य केल्याबद्दल नगरपरिषदेकडून नागरिकांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

सध्या धरण क्षेत्रात समाधानकारक पर्जन्यवृष्टी सुरू असून धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे ६ जुलै २०२६ रोजी नीरा डाव्या कालव्याचे आवर्तन सुरू करण्यात आले. त्यानंतर कालव्याचे पाणी बारामती शहरात पोहोचल्याने पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.याशिवाय, १५ जुलै २०२६ रोजी बारामती शहरात जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालखीचे आगमन होणार असल्याने शहरातील नागरिक तसेच लाखो भाविकांना अखंड व सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठीही आवश्यक नियोजन करण्यात आल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.त्यामुळे १० जुलै २०२६ पासून बारामती शहरात नियमित दैनंदिन पाणीपुरवठा सुरू होणार असून, नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर जपून व जबाबदारीने करावा, पाण्याची नासाडी टाळावी आणि बारामती नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



### जाहिर नोटीस

सर्व संबंधित नागरिकांना, संस्था, बँका, वित्तीय संस्था तसेच ज्यांचा या मालमत्तेशी कोणताही हक्क, हितसंबंध, दावा, तारण, बोजा, कब्जा किंवा आक्षेप असेल, त्यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या विद्यमान मालकीण **कै. लता रमेश हवालदार उर्फ पुष्पलता रमेश हावलदार** यांचे दिनांक **16.02.2008** रोजी निधन झाले आहे.
कै. लता रमेश हवालदार उर्फ पुष्पलता रमेश हावलदार यांच्या निधनानंतर त्यांच्या पश्चात कोणतेही वैध कायदेशीर वारस अस्तित्वात नसून, आमचे अशील हे लागू असलेल्या उत्तराधिकार (Succession) कायद्यानुसार सदर मालमत्तेचे कायदेशीर वारसदार असल्याचा दावा करीत असून, ते कायदेशीर प्रक्रियेने सदर मालमत्तेचा ताबा व मालकी हक्क प्राप्त करण्याची कार्यवाही करीत आहेत.
त्यामुळे, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणाचाही कोणताही हक्क, दावा, हितसंबंध, तारण, बोजा, करार, कब्जा किंवा कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास, त्यांनी त्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रांसह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **15 (पंधरा) दिवसांच्या** आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.
निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत किंवा दावा प्राप्त न झाल्यास, अशा कोणत्याही व्यक्तीस सदर मालमत्तेबाबत कोणताही हक्क अथवा दावा नसल्याचे गृहीत धरून आमचे अशील हे पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा किंवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**अनुसूची (Schedule of Property)**

**मिळकत :** मौजे **नांगरगाव,** ता. **मावळ,** जि. पुणे येथील **भूमापन क्रमांक 51** मधील प्रॉपर्टी कार्डनुसार **एकुण क्षेत्रफळ 34.90 गुंठे** असलेली मिळकत.
ही जाहीर नोटीस सर्व संबंधितांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे
**दिनांक: 10/07/2026**

**ॲड. फारुख एस. मुलाणी**
पत्ता: 299, दत्तवाडी, पुणे 30.
**संपर्क: 9545447029**

**वर्षा लांडगे, उपविभागीय अधिकारी पुरंदर तथा दंडाधिकारी पुरंदर उपविभाग पुरंदर यांचे कार्यालय**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम नागरिकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२) व ३ नुसार जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्या अनुषंगाने अर्जदार श्री. सुभाष बबन कामठे रा. चांबळी ता. पुरंदर जि पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३ (३) नुसार या कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार अर्जदार यांनी त्यांची आई कै. चंद्रभागा बबन कामठे रा. चांबळी ता. पुरंदर जि.पुणे येथे दि ०१/०७/१९७४ रोजी मृत्यु झालेचे नमूद करून सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर मृत्यु नोंदणीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरूस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरूपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहीत कालावधीमध्ये लेखी आक्षेप/ हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरूस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल. आज दि. १६/०६/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी ही जाहीर नोटीस देणेत आली आहे.

**क्रं.फौज/ज.मृ./एसआर/७५/ २०२४**
**दिनांक १६/०६/२०२६**
**ठिकाण :- पुरंदर**
शिक्का

**(वर्षा लांडगे)**
उपविभागीय दंडाधिकारी पुरंदर
उपविभाग पुरंदर

## द•ख•ल



### वडज धरणाच्या विसर्गाने आंबेगावच्या पूर्व भागात पूरस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**वळती :** जुन्नर तालुक्यातील वडज धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे बुधवारी सकाळी धरणातून सुमारे १८ हजार क्युसेक वेगाने पाणी मीना नदीत सोडण्यात आले. या विसर्गामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मीना नदीला यंदाचा पहिला मोठा पूर आला. वळती गावाजवळील मांगिरबाबा येथील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने वळती-शिंगवे मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू होताच मीना नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली. वळती ते नागापूर दरम्यानच्या पुलावरूनही पाणी वाहू लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले. तसेच मांगिरबाबा देवस्थानाजवळील ओढ्यात नदीचे पाणी शिरल्याने परिसर जलमय झाला.ग्रामस्थांनी तत्काळ खबरदारी घेत वळती-शिंगवे मार्गावरील वाहतूक बंद केली असून नागरिकांना पर्यायी काटवान मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. पूराचे पाणी ओसरल्यानंतरच या मार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात येणार आहे.दरम्यान, नदीकाठच्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून ऊस, चारा तसेच भाजीपाला पिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे आणि धरणातून होत असलेल्या विसर्गामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थ परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांनी अनावश्यकपणे नदीपात्रात किंवा पुलांवर जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सासवड एस टी बस स्थानक परिसरात वृक्षारोपण मोहीम राबवणार - तांबे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** राज्य परिवहन महामंडळाने एस टी च्या ७८ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्व स्थानाकाच्या आवारात ७८ हजार झाडे लावण्याचा संकल्प सोडला आहे. त्या अनुषंगाने येत्या १४ जुलै नंतर सासवड एस टी स्थानक व परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती नव्यानेच कार्यभार घेतलेल्या सासवड आगार प्रमुख वृषाली तांबे यांनी दिली. या मोहिमेत शहरातील नागरिक, नगर पालिका प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी सहभागी व्हावे असे आवाहनही तांबे यांनी केले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपानदेव महाराज व चांगा वटेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा सासवड येथून मार्गस्थ होत आहे त्या पार्शवभूमीवर सासवड आगाराने भाविकांसाठी जादा बसेसचे नियोजन केले आहे अशी माहिती तांबे यांनी दिली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाण्यासाठी किमान चाळीस प्रवाशांनी तयारी दर्शवली तर त्या गावातून स्वतंत्र बस उपलब्ध केली जाईल व एस टी च्या सध्या असणाऱ्या सर्व सवलती देखील दिल्या जातील असे सांगत या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहनही आगार प्रमुख वृषाली तांबे यांनी केले आहे .सहाय्यक वाहतूक निरीक्षक सुनील येळे, वाहतूक नियंत्रक कैलास जगताप, पोपट जैनक, प्रवीण गायकवाड यावेळी उपस्थित होते. स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले, कार्याध्यक्ष जीवन कड,सचिव गणेश मुळीक यांनी या प्रसंगी नव्याने रुजू झालेल्या वृषाली तांबे यांचे स्वागत करत त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

### कृषी सुविधा निधी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी (-खत्र) योजनेअंतर्गत १९ जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, प्रक्रिया केंद्रे, कस्टम हायरिंग सेंटर आदी कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येतो.वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, प्राथमिक कृषी पत संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट तसेच इतर पात्र संस्थांनी तालुका कृषी अधिकारी, आत्मा (-ढच-), कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. तसेच हींींिः//रसीळळपषीर.वरल.सीीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक सुरज मडके यांनी केले आहे.

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिकांना सुरक्षा उपाययोजनांचे निर्देश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अतिवृष्टीमुळे बांधकामस्थळी दुर्घटना होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार आणि नियोक्त्यांनी स्वतःची नियोक्ता म्हणून ळी.ारहरेपश्रळपश.सीीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी, तसेच कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने व उपकरणे उपलब्ध करून सुरक्षित कामकाजाची खात्री करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.जमीन खचणे, संरक्षक भिंती कोसळणे आदी संभाव्य घटनांच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या निवासस्थानी कोणताही धोका नसल्याची खातरजमा करून आवश्यक असल्यास सुरक्षित निवासाची व्यवस्था करावी. तसेच कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.यासोबतच, बांधकामस्थळी कार्यरत असलेल्या अनोंदणीकृत कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे तातडीने नोंदणी करून शैक्षणिक, सामाजिक, सुरक्षा संच, अत्यावश्यक संच, वैद्यकीय तपासणी आदी कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बांधकाम कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेसंदर्भातील शासन निर्णय (दि. १३ डिसेंबर २०११) ची काटेकोर अंमलबजावणी करावी.

# आक्षेपार्ह पोस्टमुळे करंजी कडकडीत बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**करंजी** : तालुक्यातील एका युवकाने छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह पोस्ट केली होती. त्या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी करंजी गाव व बस स्थानक परिसर संपूर्ण दिवसभर बंद ठेवुन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

करंजी बस स्थानक येथे गुरुवारी सकाळीच निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी बोलताना माजी सभापती बाळासाहेब अकोलकर म्हणाले की मोबाईल वापरणे व त्याचा उपयोग चांगला करणे हे आपल्या हातात असतं मात्र काही अपप्रवृत्ती या समाजामध्ये दुही पसरवण्याचे काम करत आहेत. अशा प्रवृत्ती पोलीस प्रशासनाने तात्काळ जेरबंद करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली.मिर्झाजी मणियार म्हणाले आपल्या महापुरुषांबाबत आदर व्यक्त करायला हवा. मात्र काही व्यक्ती त्यांच्यावरच चिखल फेक करून समाजामध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न करतात अशा व्यक्तींना कठोर शिक्षा देण्यात यावी. यावेळी महादेव अकोलकर, सुनील साखरे, विश्वास क्षेत्रे, लाजरस क्षेत्रे , राहुल अकोलकर आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या बंदला करंजी गावातील सर्व हॉटेल व्यवसाय ,कृषी केंद्र तसेच लहान मोठ्या दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवून या बंदला प्रतिसाद दिला.या बंदमध्ये

जालींदर वामन, नवनाथ आरोळे, बाबा मोरे, सुरज क्षेत्रे, रमेश शिंदे, राजेंद्र अकोलकर, फकीरा क्षेत्रे, रामा शिंदे शशिकांत क्षेत्रे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## द•ख•ल

## मराठी पत्रकार संघाच्या ओळखपत्रांचे वितरण

**निघोज :** निघोज आणी परिसरातील १७ पत्रकारांना २०२६-२०२७ या वर्षातील ओळखपत्रांचे वितरण नुकतेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट सभागृहात करण्यात आले. तसेच उर्वरित आठ पत्रकार मित्रांना अद्याप ओळखपत्र मिळाले नाही याबाबत पाठपुरावा करुन लवकरच हे ओळखपत्र मिळणार आहेत. तसेच या जागेचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असल्याने या जागेची मागणी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे करण्यात येणार आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर खासदार व आमदार यांच्याकडे निधीची मागणी करण्यात येणार आहे. या दहा गुंठा जागेत पत्रकार भवन, व्यवसायीक गाळे यांचे बांधकाम करण्यात येणार असून जेणेकरून किमान पत्रकारांना एकत्र येऊन या ठिकाणी व्यवसाय करता येईल अशा पद्धतीने नियोजन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात फेब्रुवारी मध्ये पत्रकार संघाचे जिल्हाव्यापी अधिवेशन घेण्यात आले यावेळी पद्मश्री पोपटराव पवार, शिवाजीराव शिर्के, विश्वास आरोटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शंकरराव लामखडे, संतोष रसाळ, शिवाजी लंके, विलास हारदे, आप्पासाहेब वराळ, महेश ढवळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबाजी वाघमारे, भास्कर कवाद, पत्रकार शिरीष शेलार, सतिष रासकर, विकास शेंडकर, योगेश खाडे, आनंद भुकन, सागर आतकर, रामचंद्र सुपेकर, संदीप गाडे, रामराव पवार, संपतराव वैरागर, विनोद साळवे, अविनाश भांबरे, कारभारी बाबर, मनिषाताई बाबर, जयदीप कारखिले, संतोष ईधाटे, संदीप ईधाटे, अनिल चौधरी, जयसिंग हरेल, दत्तात्रय लंके, रोहन उनवणे उपस्थित होते.

## जि. प. प्राथमिक शाळेला नवीन पाचवी व आठवीच्या समांतर वर्गास विरोध



**लिंपणगाव :** जिल्हा परिषद शाळांमध्ये चौथीनंतर पाचवी व सातवी नंतर आठवीचे वर्ग सुरू करण्याची प्रक्रिया राबवण्यात आले आहे. अनेक गावात माध्यमिक शाळा कार्यरत असताना पुन्हा पाचवी आठवीचे वर्ग समांतर सुरू केल्यास विद्यार्थ्यांचे विभाजन होऊन ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांच्या अस्तित्वात गंभीरपणे होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या धोरणाला विरोध दर्शविणारा व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अनंत भंडारी यांना निवेदन देताना जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित समवेत जिल्ह्यातील मुख्याध्यापक संघाचे नेते व सेक्रेटरी संभाजी पवार, वैभव सांगळे, दिलीप काटे, आप्पासाहेब नलगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. अशी मागणी मुख्याध्यापक दिलीप काटे यांनी केली. यावेळी मिथुन डोंगरे, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, सचिन झगडे, अमोल ठाणगे, सचिन लगड, रमजान हवालदार, सुनील भोर, रमजान सय्यद, मधुकर सुपेकर, दिलीप पानसरे, भापकर सर, सुभाष जामदार यांची स्वाक्षरी आहे.

## हातगावातील दुसऱ्या मुक्कामनतर नाथांची पालखी पंढरपूरकडे रवाना



**हातगाव :** पालखी सोहळा पैठण येथून मार्गस्थ होऊन पहिल्या मुक्कामानंतर दुसऱ्या मुक्कामी शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे दाखल होऊन मुक्काम करून सोहळा असंख्य भाविक - भक्तांच्या व गावकऱ्यांच्या उपस्थितीत बोधेगाव मार्गे पंढरपूरकडे रवाना झाला आहे. मंगळवार रोजी पैठण येथून हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत प्रस्थान झालेला हा सोहळा चणकवाडी येथे पहिला मुक्काम करून जिल्ह्यात शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे मुंगी मार्गे हातगावात सायंकाळी दुसऱ्या दाखल झाला असता गावकऱ्यांच्या व प्रशासनाने नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सदर सोहळ्याचे मोठ्या भक्ती - भावाने स्वागत करण्यात आले होते. संभाजीनगर,अहिल्यानगर व सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या हद्दीतून जाणारा हा पालखी सोहळा आता कुमडलपारगांव, मुंगसवडे, राक्षसभुवन, रायमोह, पाटोदा, दिघोळ, खर्डा,दांडेगाव, अनाळे, परांडा, बिटरगाव, कुर्डू, अरण , करकंब व होळे इत्यादी ठिकाणी मुक्काम करून सोहळा १८ व्या मुक्कामी श्री पंढरपूर येथे पोहचणार आहे. अशी माहिती या सोहळ्याचे शांती ब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांचे वंशज रघुनाथ बुवा महाराज यांनी दिली आहे.

## ना.आठवले यांच्या जिल्हा दौऱ्यामुळे आरपीआयला ऊर्जितावस्था : साळवे

**हातगाव :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांचा नुकताच जिल्हा दौरा झाला असून या दौऱ्यात त्यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्री मंडळात सामाजिक न्याय राज्य मंत्री म्हणून वर्णी लागली असल्यामुळे



दक्षिण जिल्ह्याच्या वतीने जाहीर नागरी सत्कार व पक्षाचा भव्य संकल्प मेळावा पार पडला असून या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील आरपीआयच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असल्याबाबतची माहिती आरपीआयचे दक्षिणेचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाची राहिलेली खरी उणीव ना. आठवले यांच्या रूपाने भरून निघत असल्याने त्यांनी सुरुवातीपासून खांद्यावर घेतलेली ही धुरा राज्यातील दीन - दलित ,भटक्या - विमुक्त वर्गसमूहाना परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जात आहे. कारण त्यांनी आरपीआय मध्ये सर्व जातीच्या मिळून जवळपास २४ आघाड्या तयार केलेल्या असून या आघाड्यामार्फत सर्व समावेशक असे सामाजिक व राजकीय काम ते करत असल्यामुळे अनेकाना त्याच्याच माध्यमातून न्याय मिळत आहे. असे सांगून साळवे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर आरपीआयच्या रूपाने ना. आठवले यांनाच तिसऱ्यांदा केंद्रात मंत्री होण्याची संधी मिळाली आहे. या वेळी आरपीआयचे शेवगाव तालुका प्रमुख सतिष मगर ,शहराध्यक्ष निरंजन बोरुडे व बापू मगरे हेही उपस्थितीत होते.

## पारनेर मतदारसंघात आघाडी व युतीमध्ये चुरस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सुपा** : शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळख असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेला प्रारंभ झाला असून, त्यानिमित्त जिल्हाभरातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांमध्ये हालचालींना वेग आला आहे. बँकेच्या मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक सेवा सोसायटीकडून एका अधिकृत संचालकाच्या नावाने ठराव मंजूर करणे बंधनकारक असल्याने सध्या संचालक, पदाधिकारी आणि सचिवांची धावपळ सुरू झाली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार संबंधित सेवा सोसायटीला असतो. मात्र, हा मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी सोसायटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव मंजूर करून एका संचालकाला अधिकृत प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावे लागते. त्यामुळे अनेक ठिकाणी संचालक मंडळाच्या बैठका बोलावण्यात येत असून, ठराव मंजूर करण्यासाठी लगबग सुरू आहे. यंदाच्या निवडणुकीकडे राजकीय आणि सहकार क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे लक्ष लागले आहे. विविध राजकीय गटांकडून आपल्या समर्थकांना अधिकृत प्रतिनिधी म्हणून संधी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू असून, अनेक सोसायट्यांमध्ये यावरून चुरशीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुपा परिसरातही सध्या चौका-चौकात एकच चर्चा रंगली आहे-'कोणत्या गटाच्या बाजूने विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचा ठराव होणार?' महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही गटांकडून ठराव आपल्या बाजूने व्हावा यासाठी जोरदार हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे.

मागील निवडणुकीत पारनेर मतदारसंघातील जागा बिनविरोध निवडून आली होती. मात्र, यंदाचे राजकीय चित्र बदलले असून ही जागा बिनविरोध होण्याची शक्यता कमी असल्याचे सहकार वर्तुळात बोलले जात आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही गटांनी ताकद पणाला लावण्याची तयारी सुरू केल्याने पारनेर मतदारसंघात यंदा चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ मानली जाते. शेतकरी, विविध कार्यकारी सेवा सोसायट्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी या बँकेचे घनिष्ठ नाते असल्याने तिच्या निवडणुकीला नेहमीच विशेष महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे यंदाही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाभरातील सेवा सोसायट्यांमध्ये ठराव मंजुरीसाठी हालचालींना वेग आला असून, येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## रामवाडी परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

### शेळीचा फडशा, पिंजरा लावण्याची ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : निघोज पासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या रसाळवाडी मोरवाडी परिसरातील रामवाडी परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून गुरुवार दि.९ रोजी पहाटे चारच्या दरम्यान सत्यवान विष्णू वाव्हळ यांच्या शेळीचा फडशा पाडीत बिबट्याने दहशत निर्माण केली असून याचा बंदोबस्त करण्यासाठी लवकरात लवकर रामवाडी परिसरात वनविभागाने पिंजरा लावून सहकार्य करावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाच्या अधिकारी रेष्मा पाठक तातडीने या रामवाडी येथे वाव्हळ यांच्याकडे डॉक्टर व कर्मचारी पाठवून संबंधित जागेची पाहाणी केली. बिबट्यानेच शेळीचा फडशा पाडला असल्याचे बिबट्याचा ठशावरूण सिद्ध झाले आहे. या परिसरात उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने बिबट्याने या ठिकाणी वास्तव्य केले आहे. आठ दिवसांपूर्वी लंके वस्ती, गाडीलगाव,बोदगेवाडी या परिसरात बिबट्या आला असल्याची माहिती प्रगतीशील शेतकरी दत्तात्रय रामभाऊ लंके यांनी दिली आहे. मात्र बिबट्याने दहशत निर्माण होईल असे कोनतेही कृत्य केले नसले तरी सध्या पाऊसपाणी आहे. शेतीची मशागतीची कामे सुरू आहेत. शेतकरी रानात जाण्यास घाबरत आहे. यासाठी परिसरात पिंजरा लावण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. रामवाडी येथील सत्यवान विष्णू वाव्हळ हे गरीब कुटुंब आहे शेतीला जोडव्यवसाय म्हणून ते दूध उत्पादन घेतात तसेच शेळीपालन करतात जवळपास पंधरा हजार रुपये किमतीच्या शेळीचा फडशा पाडल्याने त्यांच्यावर आर्थिक गडांतर आले आहे. वनविगाने पंचनामा केला आहे. मात्र तातडीने शेळीपालनाचा जोड व्यवसाय खंडीत पडू नये यासाठी सरकारने त्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी जनतेतून करण्यात आली आहे.



## शहरटाकळी विद्यालयात भव्य तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव** : कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंती समारंभ निमित्त १४ वर्षे व १७ वर्षे वयोगटातील मुले-मुलींच्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शाळांमधून एकूण २३ संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सोमनाथ बुचूडे भागचंद कुंडकर, मनोज घोंगडे उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती अंजली चिंतामण या होत्या. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीम.अंजली चिंतामण, पर्यवेक्षक पोपट खताळ सर, क्रीडा शिक्षक कुढेकर सर, काटे सर, तसेच विविध शाळांमधून आलेले क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **स्पर्धेचा अंतिम निकाल** १४ वर्षे वयोगट मुले प्रथम, दहिफळ हायस्कूल दहिफळ, द्वितीय - चापडगाव हायस्कूल, तृतीय - शहरटाकळी हायस्कूल शहरटाकळी, १४ वर्षे वयोगट (मुली):प्रथम -श्रीराम विद्यालय ढोरजळगाव , द्वितीय - भालेश्वर हायस्कूल भालगाव, तृतीय - चापडगाव हायस्कूल चापडगाव, १७ वर्षे वयोगट -मुले प्रथम - चापडगाव हायस्कूल चापडगाव , द्वितीय - श्रीराम विद्यालय ढोरजळगाव, तृतीय - शहरटाकळी हायस्कूल शहरटाकळी, १७ वर्षे वयोगट मुली-प्रथम - भालेश्वर हायस्कूल भालगाव , द्वितीय - चापडगाव हायस्कूल चापडगाव , तृतीय - आबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव. संपूर्ण स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध, खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडाकौशल्य, संघभावना आणि जिद्दीचे दर्शन घडविले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर विजेत्या संघांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. या तालुकास्तरीय स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, क्रिडाशिक्षक, पंच, स्वयंसेवक तसेच सर्व सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## राळेगणसिद्धीच्या तरुणांची 'आरोग्यदायी वारी' पंढरपूरकडे प्रस्थान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जातेगाव** : संत परंपरेतील भक्ती, निरोगी जीवनशैलीचा संदेश आणि युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने राळेगणसिद्धीतील तरुणांनी सुरू केलेल्या 'आरोग्यदायी वारी' उपक्रमाचे यंदा तिसरे वर्ष असून, दि. ८ जुलै रोजी श्री क्षेत्र पिंपळनेर येथून या वारीला उत्साहात प्रारंभ झाला. सहभागी तरुण तब्बल २३० किलोमीटरचा पायी प्रवास करून श्रीक्षेत्र पंढरपूर गाठणार आहेत. पहाटे पाच वाजता आरोग्यदायी वारीतील वारकऱ्यांनी महाराष्ट्रातील अखेरचे संत श्री संत निळोबाराय महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर राम कृष्ण हरी, ज्ञानोबा, तुकोबा, निळोबाच्या नामगजरात आणि भक्तिमय वातावरणात पंढरपूरच्या दिशेने उत्साहात प्रस्थान करण्यात आले.

मागील सलग दोन वर्षे या युवकांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गाने आळंदी ते पंढरपूर अशी पायी वारी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता सहभाग लक्षात घेऊन यंदा वारीचा प्रारंभ श्री क्षेत्र पिंपळनेर येथून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सहभागी सर्व तरुण निश्चित मार्गाने स्वतंत्रपणे पायी प्रवास करणार असून, या आरोग्यवारीत १५ हून अधिक युवक सहभागी झाले आहेत.

या वारीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक सहभागी दररोज किमान ५० किलोमीटर पायी चालण्याचा संकल्प पूर्ण करणार आहे. श्रद्धा, शिस्त, चिकाटी आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमातून युवकांमध्ये नियमित व्यायाम, निरोगी जीवनशैली, व्यसनमुक्ती आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## पर्यटन केंद्राच्या निकृष्ट कामांची चौकशी करा : मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : पाथर्डी वनपरिक्षेत्र कार्यालयांतर्गत शेवगाव तालुक्यात पाथर्डी रोडवरील पर्यटन केंद्राच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांविरुद्ध फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शैलेंद्र जायभाये यांनी ७ जुलै २०२६ रोजी नाशिक विभागाचे मुख्य वनसंरक्षक यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, सुमारे दीड कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले निसर्ग पर्यटन केंद्र अवघ्या दोन-तीन वर्षांतच जीर्णावस्थेत पोहोचले असून, शासनाचा निधी व जनतेचा पैसा वाया गेल्याचे चित्र आहे. पर्यटन केंद्रातील विविध बांधकामे निकृष्ट दर्जाची असून, स्थानिक व दर्जाहीन साहित्याचा वापर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच संबंधित कामांची स्वतंत्र गुणवत्ता तपासणी (क्वालिटी कंट्रोल) बाह्य यंत्रणेमार्फत करण्यात यावी, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याबाबत तातडीने चौकशी न झाल्यास वनमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करण्याचा इशाराही माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाने दिला आहे. महासंघाने या प्रकरणातील चौकशीचा अहवाल तातडीने कळविण्याची मागणीही संबंधित विभागाकडे केली आहे.




# कर्जत मतदार यादीचे विशेष सखोल पुर्ननिरीक्षण

### अभियानात कर्जत उपविभाग अव्वल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण अभियान सुरू आहे. यासाठी घरोघरी बीएलओ भेट देत असून मतदारांकडून इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) भरून घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात कर्जत-जामखेड मतदारसंघ यात आघाडीवर असून आजमितीस ३ लाख ५० हजार ५२४ मतदारांपैकी ५७ हजार ४३४ मतदारांचे फॉर्म अचूक भरण्यात आले असून १७ टक्के काम पूर्ण झाले असल्याची माहिती प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिली. विशेष म्हणजे बीएलओ अनिता टिपगुडे आणि संगिता कुटे यांनी १०० टक्के काम पूर्ण करीत एक आदर्श पायंडा इतरांसमोर मांडला.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच जिल्हाधिकारी अहिल्यानगर डॉ पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत-जामखेड मतदारसंघात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम सुरू आहे. त्यात पात्र नागरिकांची नावे समाविष्ट करणे, तसेच दुबार, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया चालू आहे. यासाठी ३२ सहायक मतदार नोंदणी अधिकारी, ३५६ बीएलओ, ३५६ सहायक बीएलओ, ३५ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम गावनिहाय सुरू आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघात एकूण ३ लाख ५० हजार ५२४ मतदार नोंदणीकृत असून या सर्व मतदारांसाठी इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) छपाई करण्यात आले आहे. सदरचे फॉर्म नियुक्त बीएलओ यांच्याकडे वितरीत करण्यात आले असून ३० जूनपासून बीएलओ प्रत्यक्ष घरी जात संबंधित मतदारांकडून अचूक भरून घेत आहे. आजमितीस कर्जत-जामखेड तालुक्यातील ५७ हजार ४३४ मतदारांचे एसआयआरचे इन्यूमरेशन फॉर्म भरण्यात आले असून त्याची टक्केवारी सरासरी १७ टक्के काम पूर्ण झाले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात कर्जत-जामखेड मतदारसंघच या मोहिमेत अग्रेसर असून प्रथम क्रमांकाचे काम नियुक्त बीएलओनी केले असल्याची माहिती कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिली. यात २२७ कर्जत जामखेड मतदारसंघात यादी भाग क्रमांक ४५ चे माळेवाडीच्या बीएलओ अनिता टिपगुडे आणि ३५५ मतदारयादी भाग क्रमांक ५१ चे बीएलओ संगिता विष्णु कुटे या दोन्ही महिला बीएलओनी आपले १०० टक्के काम अल्पावधीतच पूर्ण केल्याने महसुल विभागाकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. कर्जत तालुक्यात आजमितीस ३ लाख ५० हजार ५२४ मतदारांपैकी ३ लाख २४ हजार १६७ मतदारांना इन्यूमरेशन फॉर्म वितरीत केले आहे.

यापैकी ५७ हजार ४३४ मतदारांचे फॉर्म अचूक भरण्यात आले असून ते संबंधित बीएलओनी त्यांच्या अँपमधून ते शासनाच्या वेबसाईटवर नोंद केली आहे.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.१० जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# निसर्गाचा 'लाईव्ह' चमत्कार



## घारगावचा 'कळमजाई धबधबा' ओसंडून वाहू लागला

**नितीन शेळके | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : पावसाने जरा दट्ट्या लावताच निसर्गाने आपले रंग बदलले असून, संगमनेर तालुक्यातील घारगावजवळ वसलेला प्रसिद्ध 'कळमजाई देवीचा धबधबा' सध्या रौद्र आणि मनमोहक रूपात ओसंडून वाहू लागला आहे. उंचावरून कोसळणारा शुभ्र, फेसाळता जलप्रपात आणि चारही बाजूंनी नटलेली गर्द हिरवाई यामुळे हा संपूर्ण परिसर जणू 'स्वर्गाचा तुकडा' वाटू लागला आहे.

निसर्गाचे हे विलोभनीय रूप पाहण्यासाठी पर्यटकांची पावले आपोआप घारगावकडे वळू लागली आहेत. पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या डोंगराळ भागात ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेले

### डोंगररांगांनी पांघरली हिरवी शाल!

कळमजाई देवीचे मंदिर आहे. डोंगरात कोरलेले हे मंदिर पांडवकालीन असून, परिसरातील भाविकांचे हे मोठे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी मान्सूनची पहिली सर बरसली की, मंदिरालगतचा हा धबधबा जिवंत होतो.

हे मनोहारी सौंदर्य टिपण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे, नाशिक आणि मुंबईहून निसर्गप्रेमी, ट्रेकर्स आणि छायाचित्रकार येथे मोठी गर्दी करत आहेत. निसर्गाच्या कुशीत लपलेले पांडवकालीन मंदिर मनाला शांतता आणि भक्तीचा अनोखा अनुभव देते. निसर्ग पर्यटनासोबतच येथे येणाऱ्यांना अध्यात्मिक आनंदही मिळतो.हा परिसर केवळ सौंदर्यापुरता मर्यादित नसून वन्यजीवांनी समृद्ध आहे.

येथे बिबटे, तरस, मोरांचा वावर असून, दुर्मिळ औषधी वनस्पतींचा मोठा साठा या डोंगररांगांमध्ये आढळतो. मुसळधार पावसामुळे डोंगरावरील ओढे-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. हवेतील गारवा, धुक्याची चादर आणि जंगलातून येणारा मोरांचा मंजुळ आवाज पर्यटकांना मंत्रमुग्ध करत आहे. वीकेंडला कुटुंबासह किंवा मित्रपरिवारासोबत 'क्वालिटी टाईम' घालवण्यासाठी हा परिसर सध्या उत्तम पर्याय ठरत आहे. सोशल मीडिया प्रेमींसाठी रील बनवण्यासाठी किंवा फोटो शूट करण्यासाठी कळमजाईचा हा परिसर सध्या एक 'परफेक्ट डेस्टिनेशन' बनला आहे. सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यातून दोन क्षण निवांत घालवण्यासाठी आणि निसर्गाचा हा 'लाईव्ह' चमत्कार अनुभवण्यासाठी पर्यटकांनी कळमजाई धबधब्याला नक्की भेट द्यावी, असे आवाहन स्थानिक प्रशासनातर्फे व निसर्गप्रेमींकडून केले जात आहे.

मात्र, धबधब्याच्या ठिकाणी आनंद घेताना पर्यटकांनी सुरक्षेची काळजी घ्यावी, हीच माफक अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# शिर्डीत तरुणाच्या पोटात चाकूने वार, खूनाचा प्रयत्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान थेट जीवघेणा हल्ल्यात झाल्याची घटना घडली असून, भररस्त्यात एका २५ वर्षीय तरुणाच्या पोटात धारदार चाकूने वार करून त्याचा खून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेमुळे शिर्डी परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत फिर्यादीचा भाऊ कलिम राजू सय्यद याने शिर्डी पोलीस ठाण्यात दिली असून सुमारे दीड वर्षांपूर्वी आरोपीविरुद्ध मारहाणीची तक्रार दाखल करण्यात आली होती, सदरच्या तक्रारीचा राग मनात धरून आरोपीने कलिम सय्यद याला शिवीगाळ व दमदाटी करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर हातातील कटर काढून त्याच्या पोटाच्या डाव्या बाजूला वार करून गंभीर जखमी केले.भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या फिर्यादीवरही आरोपीने हल्ला चढविला. झटापटीदरम्यान आरोपीने कटरने फिर्यादीच्या कमरेच्या डाव्या बाजूला वार करून जखमी केले. त्यानंतर लाथाबुक्क्यांनीही मारहाण करण्यात आली. या प्रकरणी शिर्डी पोलिसांनी अक्षय ऊर्फ आकाश सुरेश रणधीर (वय २५, रा. कालीकानगर, शिर्डी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# दूध भेसळ प्रकरण; दोन दिवस उलटूनही गुन्हा दाखल नाही

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील टाकळीमिया येथे एका राजकीय व्यक्तीच्या निवासस्थानी अन्न व औषध प्रशासनाने कथितरित्या छापा टाकून दुधात भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहेत. मात्र, या घटनेला दोन दिवस उलटूनही राहुरी पोलीस ठाण्यात या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल झाल्याची अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याने, प्रशासनाच्या भूमिकेवर आणि तपासावर विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिक स्तरावरून मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने मंगळवारी रात्री एका गुप्त माहितीच्या आधारे टाकळीमिया येथील एका राजकीय व्यक्तीच्या घरावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान दुधात भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे रासायनिक साहित्य आणि पावडरचा मोठा साठा आढळून आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, इतकी मोठी कारवाई होऊनही अन्न व औषध प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती अथवा प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कारवाईबाबत गुप्तता का पाळली जात आहे, असा सवाल नागरिक विचारत आहेत. स्थानिक नागरिकांमध्ये सुरू असलेल्या चर्चेने जप्त करण्यात आलेल्या भेसळयुक्त साहित्याची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचे सांगितले जात आहे. हा संवेदनशील गुन्हा असूनही अद्याप संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई का झाली नाही? तसेच गुन्हा नोंदविण्यास इतका विलंब का होत आहे? याबाबत गावात तर्क-वितर्क लढवले जात आहेत. ही कारवाई एका राजकीय व्यक्तीशी संबंधित असल्याने राजकीय दबाव किंवा हस्तक्षेपामुळे हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे; मात्र या दाव्याला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

कोळगाव थडी दरोडा प्रकरण

# चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफाचा जामीन फेटाळला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील कोळगाव थडी येथील गाजलेल्या घरफोडी व दरोडा प्रकरणात चोरीचे सोने खरेदी केल्याचा आरोप असलेल्या सराफ व्यावसायिक महेश उदावंत याचा अटकपूर्व जामीन अर्ज कोपरगाव सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. न्यायाधीश दीपक अलमले यांनी दिलेल्या या निर्णयामुळे आरोपीला अटक करण्याचा पोलिसांचा मार्ग मोकळा झाला असून तब्बल सात महिन्यांपासून अटकेपासून मिळालेले संरक्षण संपुष्टात आले आहे. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी कोळगाव थडी येथील सिव्हिल इंजिनिअर प्रमोद धामणे हे भाच्याच्या लग्नासाठी पारनेर येथे गेले असताना त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील लॉकर फोडत रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने असा सुमारे ४० लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या घटनेने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती.

तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या निर्देशानुसार पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दरोड्यातील पाच आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून चार तोळे सोन्याच्या बांगड्या व २५ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. तपासादरम्यान चोरीचे सोने खरेदी केल्याप्रकरणी कोपरगावातील सराफ व्यावसायिक महेश व योगेश उदावंत या दोघा सख्ख्या भावांना आरोपी करण्यात आले. महेश उदावंत हा गुन्ह्यानंतर फरार झाला होता. त्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करून अटकेपासून अंतरिम संरक्षण मिळवले होते. मात्र खंडपीठाने खालच्या न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश दिल्यानंतर त्याने कोपरगाव सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सरकार पक्षातर्फे ॲड. शरद गुजर यांनी चोरीस गेलेले सुमारे २४ तोळे सोने, चांदीच्या वस्तू व रोख रक्कम अद्याप हस्तगत करायची असल्याने आरोपीला जामीन देऊ नये, असा युक्तिवाद केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला.

या प्रकरणातील इतर पाच आरोपींना यापूर्वी जामीन मिळाला असला तरी महेश उदावंत याला लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे यांनी दिली. चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफ व्यावसायिकांनाच आरोपी करण्याची ही दुर्मिळ कारवाई मानली जात असून पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती आणि पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# नेवासा पोलिसांची अमली पदार्थ विरोधात जनजागृती

## भक्तीसोबत समाजप्रबोधनाचा ही जागर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेली 'नेवासा पोलीस ठाणे अमली पदार्थ विरोधात जनजागृती मोहीम-२०२६ ही ग्रंथराज ज्ञानेश्वरी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले. प्रसिद्ध चित्रकार भरतकुमार उदावंत, सत्यजित उदावंत यांनी व्यंगचित्रे आणि आकर्षक संदेश फलकांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा प्रभावी जागर घडवून आणला.अमली पदार्थ विरोधात जनजागृती मोहीम राबवून भक्तीसोबत समाजप्रबोधनाचा ही जागर यावेळी करण्यात आला. व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार, दारूमुक्त समाज, सुदृढ परिवार, व्यसन सोडा, जीवन घडवा, रामकृष्ण म्हणा, नको आता तंबाखू-चुना तसेच ज्ञानेश्वरी वाचा गाथा, व्यसनापुढे नका टेकवू माथा अशा आशयाचे शेकडो संदेश असलेले फलक हातात घेऊन वारकरी, महिला, युवक आणि नागरिकांनी व्यसनमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. नामस्मरणाबरोबरच सामाजिक प्रबोधनाचा हा अनोखा उपक्रम उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,पोलीस निरीक्षक प्रताप दराडे,आगार व्यवस्थापक प्रशांत होले,गणेश गव्हाणे,प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे,पत्रकार अशोक डहाळे,सुधीर चव्हाण, कैलास शिंदे,रमेश शिंदे,मोहन गायकवाड,पवन गरुड,आदिनाथ पटारे आदींच्या हस्ते व्यसनमुक्ती प्रबोधन पत्रिकाचे अनावरण करण्यात आले.



# अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर एसटीची दुचाकीला धडक; वृद्धाचा जागीच मृत्यू





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बाभळेश्वर / राजुरी** : अहिल्यानगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हार-बाभळेश्वर दरम्यान असलेल्या एका हॉटेलसमोर गुरूवारी दुपारी भीषण अपघात झाला. एसटी बसने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एका ८५ वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. भाऊसाहेब किसन देठे (वय ८५, रा. कुरणपूर, ता. श्रीरामपूर) असे मृत वृद्धाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भाऊसाहेब देठे हे त्यांच्या टीव्हीएस लुना दुचाकीवरून प्रवरा नगर येथे एका विवाह समारंभासाठी जात होते. महामार्गावरील ग्रीन पार्क हॉटेलसमोर ते दुचाकीवरून रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असतानाच, समोरून येणाऱ्या एमएच १४ एमएच ६६५२ क्रमांकाच्या एसटी बसने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती की, भाऊसाहेब देठे यांचा गंभीर दुखापत झाल्याने घटनास्थळीच मृत्यू झाला. आनंदाच्या क्षणात सहभागी होण्यापूर्वीच त्यांच्यावर काळाने घाला घातल्याने कुरणपूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघाताची माहिती मिळताच लोणी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक युवराज आठरे यांनी आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. या भीषण अपघातामुळे अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे विस्कळीत झाली होती. मात्र, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक पुन्हा सुरळीत केली. याबाबत अधिक तपास लोणी पोलीस करत आहेत.

# नेवाशात नदीपात्रातून वाळूची अवैध वाहतूक

## १३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त !



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील प्रवरा नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळूचा उपसा करून तिची अवैध वाहतूक करणाऱ्या वाळूमाफियांवर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, एक डंपर, एक टेम्पो आणि वाळूसह एकूण १३ लाख २० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीसानी गुप्त बातमीदाराच्या माहितीच्या आधारे छापा टाकला. वरिष्ठ पातळीवरून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम हाती घेण्यात आली आहे. (दि.७ ) जुलै २०२६ रोजी रात्री गुन्हे शाखेचे पथक नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, त्यांना गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. नेवासा गावातील प्रसिद्ध ज्ञानेश्वर मंदिराच्या पाठीमागे प्रवरा नदीपात्रात एका डंपर आणि टेम्पोमध्ये बेकायदेशीर वाळू भरून तिची वाहतूक केली जात असल्याचे समजले. माहिती मिळताच पोलीस पथकाने तात्काळ प्रवरा नदीपात्रात जाऊन खात्री केली असता, तिथे वाळू उपसा सुरू असल्याचे दिसून आले. पोलिसांनी छापा टाकताच वाळू चोरांमध्ये एकच खळबळ उडाली.

पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून एका आरोपीला जागीच पकडले, तर दोन जण पळून जाण्यात यशस्वी झाले. एकाला अटक, दोघे फरार पकडलेल्या आरोपीची चौकशी केली असता त्याने आपले नाव ज्ञानेश्वर गोरख बर्डे (वय ४२, रा. खालाल पिंपरी, ता. नेवासा) असल्याचे सांगितले. पळून गेलेल्या साथीदारांबाबत विचारले असता, त्याने खालील माहिती दिली असता रामकृष्ण नवनाथ आळकुटे (रा. गंगानगर, नेवासा) - टेम्पो मालक (फरार), अन्य एक अज्ञात टेम्पो चालक (नाव, गाव माहीत नाही - फरार) असे आरोपीचे नावे आहेत. त्यांच्याकडून १३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त पोलिसांनी घटनास्थळावरून खालील मुद्देमाल जप्त केला आहे. यात एक डंपर, एक टेम्पो, २ ब्रास वाळू एकूण १३,२०,०००/- असा एकुण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल याप्रकरणी ताब्यात घेतलेल्या आरोपीविरुद्ध आणि फरार आरोपींविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५९४/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) आणि ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नेवासा पोलीस करत आहेत. सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उप.नि.संदिप दरवडे, पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, विजय पवार आणि योगेश कर्डीले यांच्या पथकाने केली आहे. या कारवाईमुळे नेवासा परिसरातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

# मध्यरात्री शेळ्यांच्या गोठ्यावर चोरट्यांचा डल्ला

## ३८ हजारांचा मुद्देमाल लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील साकूर परिसरातून एक धक्कादायक आणि तितकीच खळबळजनक घटना समोर आली आहे. चोरट्यांनी आता आपला मोर्चा थेट शेतकऱ्यांच्या गोठ्यांकडे वळवला असून, मध्यरात्रीच्या सुमारास एका गोठ्यातून तब्बल ३८ हजार रुपये किमतीच्या ४ शेळ्या आणि १ बोकड चोरून नेल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण चोरी गोठ्याबाहेर बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

साकूर येथील रहिवासी नासीर कादर मिस्तरी (वय ४५) यांनी आपल्या घरासमोर जनावरांच्या सुरक्षेसाठी लोखंडी जाळीचा एक मजबूत गोठा तयार केला होता. नेहमीप्रमाणे ४ जुलै रोजी रात्री सर्व जनावरे गोठ्यात सुरक्षित बांधून मिस्तरी कुटुंब झोपी गेले होते. मात्र, मध्यरात्री साडेतीन वाजण्याच्या सुमारास गोठ्यातील लहान बकऱ्यांचा अचानक मोठ्याने ओरडण्याचा आवाज येऊ लागला. या आवाजामुळे नासीर मिस्तरी यांना तात्काळ जाग आली.

मिस्तरी यांनी तात्काळ घराबाहेर येऊन पाहिले असता, गोठ्याच्या जाळीचा दरवाजा उघडा दिसला. गोठ्यात डोकावून पाहताच त्यांना मोठा धक्का बसला. चोरट्यांनी गोठ्यातील ४ लहान बकऱ्यांना हातही लावला नव्हता, मात्र २ वर्ष वयाच्या चांगल्या धष्टपुष्ट ४ शेळ्या (किंमत अंदाजे २८,००० रुपये) आणि १ महागडा बोकड (किंमत अंदाजे १०,००० रुपये) असा एकूण ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. लहान बकऱ्यांच्या ओरडण्यामुळे हा सर्व प्रकार उघडकीस आला.

मिस्तरी यांनी घटनेनंतर परिसरात सर्वत्र शोध घेतला, परंतु चोरटे अंधाराचा फायदा घेऊन जनावरांसह पसार होण्यात यशस्वी झाले होते. अखेर या प्रकरणी नासीर मिस्तरी यांनी घारगाव पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या चोरीची सर्वात मोठी गोम म्हणजे चोरांची ही 'लाईव्ह करामत' गोठ्याबाहेर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. या फुटेजमुळे आता चोरांचे धाबे दणाणले असून, पोलीस या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरांचा माग काढत आहेत. दरम्यान, ग्रामीण भागात झालेल्या या हटके चोरीची आणि सीसीटीव्ही फुटेजची परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास घारगाव पोलीस करत आहेत.